रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २१०
www.ramprahar.com
शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

समाजमाध्यमावर स्टेटस ठेवण्यावरून वाद/२
मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर पाच वाहनांचा विचित्र अपघात/५
राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर/८

### महाकुंभात विक्रम; आतापर्यंत ५० कोटी भाविकांचे गंगास्नान



**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये आयोजित महाकुंभमध्ये गंगा नदीत पवित्र स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या ५० कोटींपेक्षा जास्त झाली आहे. आतापर्यंत कोणत्याही कार्यक्रमात इतक्या मोठ्या संख्येने लोक सहभागी झाल्याचे पुरावे मिळालेले नाहीत, असे म्हटले जात आहे. दरम्यान, महाकुंभमेळा संपण्यास अजून बराच वेळ आहे. महाकुंभमेळ्यातील शेवटचे अमृत स्नानदेखील बाकी आहे, जे महाशिवरात्रीला होणार आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. ब्राझीलच्या रिओ कार्निव्हल किंवा जर्मनीच्या ऑक्टोबर फेस्टमध्ये जमणारी मोठी गर्दी प्रयागराजमधील आयोजित महाकुंभमेळ्याच्या तुलनेत काहीच नाही.

# विकसित भारताचे ध्येय सामान्य नागरिकच पुढे नेतील

## केंद्रीय अर्थसंकल्पाचे आमदार निरंजन डावखरेंकडून विवेचन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला सर्वसमावेशक अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने जाणारा मार्ग अधिक प्रशस्त करणारा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीयांची बचत वाढणार असून त्यांची क्रयशक्ती उंचावल्याने देशाच्या विकासाला चालना मिळेल. १४० कोटी भारतीयांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प असून विकसित भारताचे ध्येय सामान्य नागरिकच पुढे नेतील, असा विश्वास भाजप सोशल मीडियाचे राष्ट्रीय समन्वयक व कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी शुक्रवारी (दि. १४) येथे पत्रकार परिषदेत व्यक्त केला. नागरिकांची बचत वाढून तेच देश विकासाचे भागीदार कसे बनतील यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या असल्याचेही त्यांनी या वेळी नमूद केले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात त्यांनी वित्तीय तूट ४.९ टक्क्यांवरून ४.४ टक्के खाली आणण्याचे ध्येय सरकारने ठेवल्याचे जाहीर केले. हे करत असताना त्यांनी शेतकरी, महिला, अनुसूचित जाती जमातीचे उद्योजक, मध्यमवर्गीय यांना दिलेल्या सवलतींमध्ये कुठेही कात्री न लावता उलट त्यात भरघोस वाढ केल्याचे दिसून आल्याचे त्यांनी सांगितले.

पनवेल मार्केट यार्ड येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेस भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस व पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख नितीन पाटील, जिल्हा सरचिटणीस व प्रवक्ते अॅड. प्रकाश




> ***केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जो अर्थसंकल्प मांडला त्या अर्थसंकल्पातून सर्वसमावेशक विचार करण्यात आला आहे. सर्वसामान्य माणसाला आणि देशाच्या विकासाला केंद्रबिंदू मानून हा अर्थसंकल्प सादर झाला आहे. या अर्थसंकल्पाच्या तरतुदी देशातील प्रत्येक नागरिकाने समजून घेतल्या पाहिजेत. लोकांपर्यंत पोहचण्यासाठी प्रसारमाध्यम महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यामुळे पत्रकार परिषदेच्या माध्यमातून राज्यभर माहिती दिली जात आहे.***
> **-प्रशांत ठाकूर, आमदार, पनवेल विधानसभा मतदारसंघ**

बिनेदार, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष राजेश गायकर उपस्थित होते.

शेतकरी, गरीब, महिला आणि युवा हे विकसित भारताचे चार प्रमुख स्तंभ असून त्यांच्या सशक्तीकरणासाठी अर्थसंकल्पाने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. सामाजिक क्षेत्र, लहान मुले व युवा शिक्षण, पोषण तसेच आरोग्यापासून स्टार्टअप्स आणि गुंतवणुकीपर्यंत प्रत्येक क्षेत्राला गती देणाऱ्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. हा अर्थसंकल्प गरीब आणि मध्यमवर्गीयांना सशक्त करणार असून तरुणांना रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण करणारा आहे, असा विश्वास आमदार डावखरे यांनी व्यक्त केला. ग्रामीण विकासासाठी कृषी क्षेत्र, उद्योजकता वाढ, रोजगारनिर्मिती, एमएसएमई क्षेत्र, पायाभूत सुविधा व नाविन्यासाठी गुंतवणूक तसेच जागतिक स्तरावर आर्थिक स्पर्धात्मकतेसाठी निर्यात क्षेत्र या चार प्रमुख आधारस्तंभांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. करप्रणाली, शहरी विकास, खाणकाम, वित्तीय सुधारणा, ऊर्जा आणि नियामक सुधारणा या सहा क्षेत्रांतील सुधारणांना प्राधान्य देण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना, खाद्यतेल आत्मनिर्भरतेसाठी सहा वर्षांची विशेष मोहीम, मखाना आणि मत्स्य उत्पादनासाठी स्वतंत्र मंडळ, फळ-भाजीपाला उत्पादक व कापूस शेतकऱ्यांसाठी विशेष योजना, युरिया आत्मनिर्भरता योजना, यांसारख्या महत्त्वपूर्ण योजनांमुळे देशातील अन्नदाते अधिक सक्षम होतील. याशिवाय पाच नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना, भारतीय भाषा पुस्तक योजना, सर्व सरकारी माध्यमिक शाळांना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी, पुढील पाच वर्षांत ५० हजार अटल टिंकरिंग लॅब्स यांसारख्या महत्त्वपूर्ण शैक्षणिक तरतुदींमुळे भारतातील विद्यार्थी जागतिक दर्जाच्या शिक्षणाने सक्षम होतील. देशाच्या उज्वल भविष्यासाठी मध्यमवर्गाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त, ज्येष्ठ नागरिकांसाठी बँक व्याजावर टीडीएस मर्यादा ५० हजारवरून एक लाख रुपये, घरभाड्यावर टीडीएस मर्यादा २.४० लाखवरून सहा लाख रुपये यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयांमुळे मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा मिळाला.

महाराष्ट्रासाठी मुंबई मेट्रो, पुणे मेट्रो, एमयूटीपी, एमएमआरसाठी एकात्मिक आणि हरित प्रवासी सुविधा, मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वे, सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर, महाराष्ट्र ग्रामीण जोडसुधार प्रकल्प, महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस नेटवर्क, नाग नदी सुधार प्रकल्प, मुळा-मुठा नदी संवर्धन, ऊर्जा कार्यक्षम उपसा सिंचन प्रकल्प तसेच इतर प्रकल्पासाठी भरीव आर्थिक तरतूद, त्याचबरोबर बजेटमधून पायाभूत सुविधांसाठी बिनव्याजी कर्ज राज्याला मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सामाजिक विकासासोबतच पायाभूत सुविधा, गृहनिर्माण, शाश्वत आर्थिक विकास, तंत्रज्ञान, आरोग्य, कृषी, एमएसएमई आणि निर्यात यांसारख्या क्षेत्रांसाठी मोठ्या प्रमाणात तरतुदी करण्यात आल्या आहेत. उत्पादन क्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रित करून लघु व मध्यम उद्योगांना बळकटी देण्यासाठी सरकारने महत्त्वाची पावले उचलली आहेत, असेही सांगण्यात आले. जन आरोग्य योजना, सक्षम आंगणवाडी व पोषण २.० कार्यक्रम, गिग वर्कर्सचे कल्याण आणि जलजीवन मिशन यांसारख्या योजनांना अधिक बळ देत सामाजिक न्याय व जनकल्याणालाही सरकारने प्राधान्य दिले आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

## न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक मंडळ बरखास्त

### आरबीआयची कारवाई

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडवर रिझर्व बँकेने मोठी कारवाई केली आहे. आर्थिक अनियमिततेमुळे या बँकेचे मुंबईचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले आहे. आरबीआयकडून या बँकेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली असून प्रशासकाच्या मदतीला अॅडव्हायजर कमिटीचीदेखील नियुक्ती केली गेली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक लि. बँकेवर आरबीआयकडून ३५ अ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. आरबीआयने या बँकेवर कडक निर्बंध लादले आहेत. आता ही बँक कुणालाही नवीन कर्ज देऊ शकणार नाही आणि सध्याच्या कर्जाचे नूतनीकरणही करू शकणार नाही तसेच बँक नवीन ठेवी स्वीकारू शकणार नाही आणि कोणतीही गुंतवणूक करू शकणार नाही.

रिझर्व्ह बँकेने एका निवेदनात दिलेल्या माहितीनुसार बँकेतील अलीकडील आर्थिक अनियमितता लक्षात घेऊन आणि ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ही पावले उचलण्यात आली आहेत. हे निर्बंध पुढील सहा महिने लागू राहतील. या कालावधीत या निर्बंधांचे पुनरावलोकन केले जाईल आणि परिस्थितीनुसार निर्णय घेतला जाईल.



**प्रयागराज : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाकुंभमेळ्यात सहकुटुंब सहभागी होऊन पवित्र स्नान आणि पूजा अर्चना केली.**

## निवडक

### पंतप्रधान मोदींसाठी ट्रम्प यांची विशेष कृती चर्चेत

**वॉशिंग्टन डीसी :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी (स्थानिक वेळेनुसार) वॉशिंग्टन डीसी येथील व्हाईट हाऊसमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जोरदार स्वागत केले. वेस्ट विंग लॉबीमध्ये दोन्ही नेत्यांनी एकमेकांना आलिंगन दिले. त्यांच्या या अलिंगनाची चर्चा सुरू असतानाच एक व्हिडीओही व्हायरल होतोय. त्यात स्वतः राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींना बसण्यासाठी खुर्ची दिली. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी दुसऱ्या कार्यकाळात पदभार स्वीकारल्यानंतर पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच अमेरिका दौरा आहे.

### मराठी सिनेमांसाठी राज्य सरकारने आखला प्लॅन

**मुंबई :** राज्याचे सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार यांच्या मंत्रालयाने मराठी सिनेमाला प्राधान्य देण्याच्या दृष्टीने एक मास्टरप्लॅन तयार केला आहे. मंत्रालयातील दालनात सिंगल स्क्रीन थिएटर म्हणजे एक पडदा सिनेमागृह याबाबत चर्चात्मक बैठक घेण्यात आली आणि त्यातूनच एक प्लॅन बनवण्यात आला आहे. आगामी काळात या संदर्भात कार्यवाही होणार आहे.

## नवी मुंबईत आज 'दिबा योद्धा' सत्कार समारंभ आणि सभा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समिती आणि अखिल आगरी समाज परिषदेच्या वतीने कार्यकर्त्यांची सभा शनिवारी (दि. १५) नवी मुंबईतील वाशी येथे आयोजित करण्यात आली आहे. या वेळी विमानतळ नामकरण लढ्यात सक्रिय सहभाग घेणारी नेतेमंडळी आणि प्रमुख कार्यकर्त्यांना 'दिबा योद्धा' म्हणून गौरविण्यात येणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भूमिपुत्रांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव राज्य सरकारने केलेला असून तो केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. केंद्राकडूनही याबाबत निर्णय होणे अपेक्षित आहे. या संदर्भात चर्चा करण्यासाठी वाशी सेक्टर १४ येथील नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन या ठिकाणी सकाळी ११ वाजता कृती समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची सभा होणार आहे.

या वेळी राज्याचे नवनिर्वाचित वनमंत्री गणेश नाईक आणि आमदारांचा सत्कार करण्यात येणार आहे, ज्यांनी विमानतळ नामकरण लढ्यात सहभाग घेतला. त्याचप्रमाणे प्रमुख कार्यकर्त्यांनाही 'दिबा योद्धा' म्हणून गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमानंतर अर्ध्या तासाने अखिल आगरी समाज परिषदेची बैठक होईल व त्यामध्ये नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात येतील तसेच संघटना बांधणीवर चर्चा केली जाणार आहे. सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विमानतळ कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील व इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## 'लव्ह जिहाद' विरोधात कायद्यासाठी विशेष समिती स्थापन

**मुंबई :** राज्यात लव्ह जिहादच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर फसवणूक, बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण रोखण्यासाठी कायदा करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे.

## तोतया सीबीआय अधिकाऱ्याकडून डॉक्टरची फसवणूक

**खोपोली : प्रतिनिधी**

सीबीआय अधिकारी असल्याची बतावणी करून अटकेची भीती दाखवत महिला डॉक्टरच्या खात्यातून ४५ लाख नऊ हजार ९९८ रुपये उकळल्याची घटना खोपोली शहरात घडली. या प्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

डॉ. रश्मी रवींद्र टिळक यांचे खोपोली येथे मिहीर मॅटरनेटी अॅण्ड जनरल हॉस्पिटल आहे. अज्ञात व्यक्तीने सीबीआय अधिकारी असल्याचे सांगत डॉ. रश्मी यांना त्यांच्या क्रेडीट कार्डने तीन कोटींचे ड्रग्स विकत घेतले गेले आहेत व त्याकरिता तुम्ही दोषी असून ठराविक रक्कम भरल्यास तुमची सुटका होईल अशी बतावणी केली. आरोपीने वेळोवेळी पोलिसांकडून अटकेचा धाक दाखवून ही कारवाई होऊ नये म्हणून डॉक्टरांच्या तीन वेगवेगळ्या बँक खात्यातून एकूण ४५ लाख नऊ हजार ९९८ रुपये आरोपीच्या खात्यात वळवले. फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यानंतर डॉ. रश्मी यांनी बनावट सीबीआय अधिकारी आणि बँक खातेधारकाविरुद्ध पोलिसात तक्रार दिली. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.




## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने पटकावले सर्वोत्तम राज्य विजेतपद

**हल्दवानी : वृत्तसंस्था**



उत्तराखंडमधील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचे द्विशतक झळकविणाऱ्या महाराष्ट्राला सर्वोत्तम राज्य विजेतपदाच्या करंडकाने शुक्रवारी (दि. १४) गौरविण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते महाराष्ट्राला राज्य विजेतपदाचा करंडक देण्यात आला.

३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा शानदार समारोप सोहळा हल्दवानी येथील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये रंगला. या दिमाखदार समारंभात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव नामदेव शिरगावकर यांनी सर्वोत्तम राज्य विजेतपदाच्या करंडक स्वीकारला. या वेळी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मंडेलिया, भारतीय ऑलिम्पिक महासंघाच्या अध्यक्ष पी.टी. उषा, उत्तराखंडच्या क्रीडामंत्री रेखा आर्या, महाराष्ट्र संघाचे पथकप्रमुख संजय शेटे, उदय डोंगरे, विठ्ठल शिरगावकर उपस्थित होते.

उत्तराखंडातील स्पर्धेत ५४ सुवर्णांसह ७१ रौप्य, ७६ कांस्य अशी एकूण २०१ पदकांची लयलूट करीत पदकतक्यात महाराष्ट्र महाराष्ट्राने दुसरे स्थान मिळविले. स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा राज्यातील संघांमध्ये महाराष्ट्र अव्वल ठरला. अहमदाबाद, गोवापाठोपाठ उत्तराखंड स्पर्धेत महाराष्ट्र देशातील संघांमध्ये अव्वल येण्याची ऐतिहासिक हॅट्ट्रिक साजरी केली आहे.

तब्बल २७ क्रीडाप्रकारात महाराष्ट्राने पदके जिंकण्याचा कामगिरी केली आहे. जिम्नॉस्टिक्स सर्वाधिक १२ सुवर्णांसह २४ पदके महाराष्ट्राने जिंकली आहेत. महाराष्ट्राने कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार, क्रीडामंत्री दत्ता भरणे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# एसटी डेपोची जागा विकसित करण्यासाठी खासगी बिल्डर्सना आमंत्रण



एसटी डेपो विमानतळाप्रमाणे चकाकणार?

**मुंबइ : प्रतिनिधी**

राज्यात शेकडो एसटी बस आगार असून त्यांची हजारो एकर जमीन आहे. आता राज्य सरकारकडून पीपीपी मॉडेलचा आधार घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ३,३६० एकर जमिनीवर खासगी बिल्डर्सच्या माध्यमातून विकास करण्यासाठी आमंत्रित केले जाणार आहे. यासाठी राज्य सरकार लवकरच १५० निविदा काढणार आहे, अशी माहिती राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मुंबई महानगर क्षेत्रातील मुंबई सेंट्रल, कुर्ला, विद्याविहार आणि चिंचबंदर येथील मोक्याच्या ठिकाणी एमएसआरटीसीच्या ताब्यात २६ एकरची जमीन आहे. याशिवाय पुण्यातील स्वारगेट आणि सांगवी येथे २४ एकरची जागा आहे. हे दोन महानगर वगळता महामंडळाकडे जिल्हा स्तरावर ८८५ एकर, तालुका स्तरावर १,५३५ एकर आणि गाव पातळीवर ९४५ एकर जमीन आहे.

विकासकांनी देऊ केलेल्या प्रीमियमच्या आधारावर प्रकल्पांचे वाटप केले जाईल, तसेच 'एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली' (यूडीसीपीआर) अंतर्गत विकासकांना एफएसआय दिला जाईल. या प्रकल्पातील व्यावसायिक गाळे भाड्याने देण्याची जबाबदारी विकासकाची असेल. या प्रकल्पानुसार, कार्यालये, हॉटेल, शॉपिंग सेंटर आणि दुकान गाळ्यांचे बांधकाम केले जाईल. जिल्हा स्तरावर विकास करताना १०० खाटांचे हॉस्पिटल बांधले जाईल. तसेच महामंडळाच्या कामासाठीही सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

एसटीचे आगार विमानतळाप्रमाणे तयार करणार, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या वाढदिवशी वातानुकूलित विश्रांतीगृहाचे उद्घाटन करतांना प्रताप सरनाईक यांनी तरुण बांधकाम व्यावसायिकांना संबोधित करताना म्हणाले, एसटी डेपोमध्ये प्रवाशी आणि कर्मचारी यांना चांगल्या सोयी-सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. स्वच्छ शौचालय, महिलांसाठी प्रसाधनगृहे आणि रात्रपाळीच्या कर्मचाऱ्यांसाठी राहण्याची सुविधा दिली जाईल. नियोजन प्राधिकरण म्हणून परिवहन खाते या प्रकल्पांवर देखरेख ठेवेल. वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांच्या सहकार्यातून एसटी डेपोंचा विमानतळाच्या धरतीवर विकास केला जाईल.

एसटी डेपोच्या विकासाची रूपरेषा सादर करण्यासाठी सरकारने वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांची नियुक्ती केली आहे. विकासाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एमएसआरटीसी विकास योजनांना केंद्रीय पातळीवर मंजुरी देईल. ज्यामुळे शासनाच्या विविध यंत्रणाकडून परवानग्या मिळविण्यातला वेळ वाचेल. याशिवाय विकास प्रकल्पांवर देखरेख ठेवण्यासाठी एसटी महामंडळ आपल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या क्षमताही वाढविण्याच्या विचारात आहे.

## ऐरोली येथे अतिक्रमण विरोधात धडक कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्यावतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात अतिक्रमण विभागामार्फत ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

ऐरोली कार्यक्षेत्रातील से-०३ येथील गामी जनरल स्टोअर्स, गाळा नं. ऐ-३३, ऐरोली येथील वाढीव बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविले नसल्याने सदरचे अनधिकृत बांधकाम दिनांक १३ फेब्रुवारी रोजी अतिक्रमण मोहिम राबवून बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे.

या धडक मोहिमेसाठी १ गॅस कटर, २ ब्रेकर व ०८ मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली सहा. आयुक्त डॉ. अंकुश जाधव, कनिष्ठ अभियंता संदीप म्हात्रे व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सदर कारवाई अंतर्गत दंडात्मक शुल्क रूपये १० हजार वसूल करण्यात आले आहे.तसेच यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

## ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, महिलांना प्रमाणपत्र वाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र महोत्सव समितीच्या वतीने महाराष्ट्र महोत्सवात नेरुळ जुईनगरमधील शिवण क्लासेसचे प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रमाणपत्र वाटप आणि ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार भाजपा नवी मुंबई उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, स्थानिक माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांच्या हस्ते :करण्यात आला.

जुईनगर येथे श्री स्वामी समर्थ मठाच्या बाजूला सेक्टर २२ येथे महाराष्ट्र महोत्सव सुरु आहे. नवी मुंबई मनपाच्या माध्यमातून आणि स्थानिक माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांच्या प्रयत्नाने नेरुळ जुईनगर येथील महिलांना शिवणकाम प्रशिक्षण देण्यात आले. त्या प्रमाणपत्राचे वाटप महोत्सवात करण्यात आले. या वेळी युवा नेते ऋषिकेश पाटील देखील उपस्थित होते.




## 'गेल इंडिया'च्या वतीने देऊळ भेरसे येथील विद्यार्थिनी व महिला घेताहेत स्वसंरक्षण प्रशिक्षण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल इंडिया लिमिटेड, उसर यांच्यावतीने रा.जि.प. शाळा, देऊळ भेरसे येथील विद्यार्थिनींसाठी व महिलांसाठी पाच दिवसीय मोफत स्वसंरक्षण स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन मुख्य महाप्रबंधक पीडीएचपीपी प्रोजेक्ट गेल उसर ,अनुप गुप्ताव महाप्रबंधक जितिन सक्सेना,शितल लाकरा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले

प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन अस्मिता अमरदीप साळुंके मुख्याध्यापिका रा.जि.प शाळा, देऊळ भेरसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमास आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी, शुभांगी उल्हास राणे- उपशिक्षिका, स्थानिक महिला अश्विनी पाटील, साधना पाटील, प्रशिक्षिका प्रणाली तळेगावकर, मनीषा माने, दिव्या शिंदे, निकी बेंडे व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



स्मिता साळुंके यांनी प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेल्या मुलींना शुभेच्छा देत स्वसंरक्षणाचे महत्त्व सांगितले. या स्वसंरक्षण प्रशिक्षणामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण होईलअसे सांगुन प्रिझम सामाजिक विकास संस्थेस शुभेच्छा दिल्या तर तपस्वी गोंधळी यांनी या पाच दिवसाच्या स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिरामध्ये कशाप्रकारे प्रशिक्षण दिले जाणार आहे याविषयी सविस्तर माहिती दिली. या प्रशिक्षणास देऊळ भेरसे येथील विद्यार्थी व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

## पत्रकार आनंद जोशी यांना रायगड प्रेस क्लबचा जीवनगौरव पुरस्कार




**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील पत्रकार आनंद जोशी यांना रायगड प्रेस क्लबच्यावतीने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चाळीस वर्षांच्या अथक पत्रकारिता सेवेला या पुरस्काराने योग्य मान्यता दिली असून, जोशी सरांनी समाजाची मानसिकता बदलण्यासाठी आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात एक नवा आदर्श उभा केला आहे.

रायगड प्रेस क्लबच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त १४ फेब्रुवारी २०२५ रोजी खोपोली येथील महाराजा मंगल कार्यालयात झालेल्या पत्रकार सन्मान सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण होते, रायगड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते जोशी सरांचा गौरव करण्यात आले.

जोशी सरांचे पत्रकारितेतील योगदान केवळ त्यांचे लेखन नाही, तर रायगड जिल्ह्यातील पत्रकारांच्या सामाजिक बांधिलकीसाठी त्यांनी केलेली सातत्यपूर्ण आणि प्रेरणादायक सेवा देखील उल्लेखनीय आहे. त्यांनी समाजातील विविध समस्यांवर नवा दृष्टिकोन मांडला आणि सत्याच्या बाजूने आवाज उठवला.त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना जीवनगौरव पुरस्कार मिळालेला आहे, जो त्यांच्या कर्तृत्वाचा साक्षात्कार आहे.

या कार्यक्रमात राज्यस्तरीय संपादक पुरस्कार तसेच जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एस. एम. देशमुख यांनी भूषवले. या वेळी सर्व तालुक्यातील पदाधिकारी तसेच जिल्हा अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## ग्रामदैवत श्री वाकडाई देवीच्या पालखीस पोलिसांची मानवंदना

**माणगाव : बातमीदार**

माणगांवचे ग्रामदैवत श्री वाकडाई देवी मंदिर जिर्णोध्दाराच्या दूसऱ्या वर्धापन दिनानिमित्ताने शुक्रवार (दि.१४ ) रोजी उतेखोलगांव व वाडी येथील देवीचा भव्य पालखी सोहळा मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्या निमीत्ताने सकाळी ७ वा. श्री व सौ प्रियाली प्रविण मोने या दांपत्यास देवीला अभिषेक घालण्याचा मान मिळाला. सकाळी ८ वा. श्री वाकडाई मंदिर ते हनुमान मंदिर पालखी मिरवणूक कचेरी रोड मार्गे परंपरेनुसार पोलीस ठाण्यातील देवीच्या स्थानी आली, या प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वात पोलीसांकडुन पालखीस मानवंदना देऊन स्वागत केले. उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांनी देखील पालखीचे दर्शन घेतले. पुढे साई मंदिर - उतेखोलवाडी हनुमान मंदिर, वाकडाई नगर मार्गे पालखीने मंदिराकडे प्रस्थान केले.







देवीच्या पालखी सोबत खालु-बाज्या डिजेच्या गजरात लेझीम नाचत, वाजत, गाजत, आई वाकडाई माते की जय असा देवीच्या नावाचा जयघोष करीत, उतेखोल मधिल युवा-युवती महिला-पुरुष आबालवृध्द आनंदाने बेभान होऊन नाचत होते , पुरुषांनी गडद अबोली झब्बे महिलांनी आकाशी मोरपीसी साड्या असा खास पोषाख परिधान करुन भगवा ध्वज दिमाखात फडकावत मिरवणुक माणगांवकर महिलांना देवीचे दर्शन आरती व ओटी भरण्यासाठी जागोजागी थांबत जल्लोषात मार्गस्थ होत होती., या सोहळ्यासाठी श्री वाकडाई देवी उत्सव कमिटी, ग्रामस्थ व महिला मंडळ उतेखोल गाव व उतेखोलवाडी गावकीने उत्साहाने नियोजन करुन भाविकांचे मनोभावे स्वागत केले.

## युवा उद्योजक विक्रम साबळे यांचा प्रेस क्लबतर्फे सन्मान

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड प्रेस क्लब व खालापूर प्रेस क्लब यांच्या वर्धापन दिनाच्या औचित्य साधत खोपोली शहरातील काशी होमचे,युवा उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते विक्रम यशवंत साबळे यांना सन्मानित करण्यात आले.

विक्रम साबळे यांनी आपले आजोबा स्व. लक्ष्मणसेठ साबळे व वडील यशवंतशेठ साबळे यांच्या पावलावर पाऊल ठेवून सामाजिक क्षेत्रात अल्प वेळात त्यांनी उत्तम प्रकारे उद्योग व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याच्या पार्श्वभूमीवर रायगड प्रेस क्लबने याची दखल घेत त्यांना सन २०२५ चा युवा उद्योजक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

या कार्यक्रमाला खासदार सुनील तटकरे, प्रेस क्लबचे संस्थापक एस एम देशमुख, दैनिक सागरच्या संपादिका शुभदा जोशी, ज्येष्ठ उद्योजक राजू जोशी, प्रेस क्लबचे मावळते अध्यक्ष मनोज खांबे, नवनिर्वाचित अध्यक्ष प्रशांत गोपाळे, यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व जिल्हाभरातील पत्रकार उपस्थित होते.



## समाजमाध्यमावर स्टेटस ठेवण्यावरून वाद; गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

मोबाईल फोनच्या स्टेटसला छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजल खानाच्या केलेल्या वधाचा फोटो ठेवला या कारणावरुन कुटुंबाला धमकावण्याचा प्रकार खोपोली पोलीस ठाणे हद्दीत घडला आहे. खोपोली यशवंत नगर येथे राहणा-या नवनाथ याने मोबाईल स्टेटसला अफजलखान वधाचा स्टेटस ठेवल्याने दोन इसमानी




घरात शिरुन नवनाथ यांचे आईकडे विचारणा करुन त्यांचा मुलगा याला उद्देशून नवनाथला परत येऊ द्या मग बघून घेऊ असे बोलून धमकी दिली. त्यावेळी नवनाथ यांचे घराचे बाहेर साधारण दहा ते पंधरा लोक बेकायदेशीररित्या जमले होते. यामुळे घाबरलेल्या कुंटुबाने

खोपोली पोलीस ठाणे जमावा विरुद्ध तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक तपास पोलीस निरीक्षक शितलकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई हनुमंत पवार करीत आहेत.

## ३४ वर्षीय महिला बेपत्ता

**नवीन पनवेल :** सेक्टर १४, कामोठे येथून ३४ वर्षीय गीता अविनाश जाधव ह्या घरी परत न आल्याने हरवल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्यांची उंची पाच फूट, रंग सावळा, चेहरा उभट आहे. अंगात गुलाबी रंगाचा पंजाबी ड्रेस आणि पायात पांढऱ्या रंगाची प्लास्टिकची चप्पल घातली आहे. नाकात बारीक सोन्याची चमकी असून गळ्यात छोटे मंगळसूत्र आहे.

# कळंबोली सर्कलवरील पनवेल एक्झिटवरील कामाला गती

## वाहतूक कोंडीमधून वाहनचालकांना मिळणार दिलासा




**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडून कळंबोली जंक्शनची सुधारणा करण्यात येत आहे. कळंबोली सर्कल येथे नव्याने उड्डाणपुल व भुयारी मार्गाचे काम हाती घेण्यात आले असल्याने वाहतूक कोंडीमधून वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे.

दरम्यान या कामामुळे कळंबोली सर्कल येथे वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मुंबई वाहिनीवरील पनवेल एक्झीट हा पुढील ६ महिने बंद ठेवण्यात आला असून सध्या युद्ध पातळीवर काम सुरू आहे. खोदकाम करायला सुरवात केली असून सर्व यंत्रणा जलदगतीने कामाला लावली असल्याचं महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडून सांगण्यात आले आहे.

आता लवकरच नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. कळंबोली जंक्शन अपग्रेड करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. रस्ते विकास महामंडळ नोडल एजन्सी असून याकरता केंद्रीय रस्ते विकास विभागाकडून ७७० कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. यामुळे हे वाहतूक सिग्नल आणि ट्रॅफिक फ्री होणार आहे.

त्यामुळे तासनतास वाहनांना अडकून पडावे लागणार नाही. क्रॉस कॉनफ्लेक्ट सुद्धा दूर होणार आहे. परिणामी वेळ आणि इंधन वाचणार आहे. माती परीक्षणाचे कामसुद्धा युद्धपातळीवर सुरू आहे. या व्यतिरिक्त कामामध्ये कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी सहा महिन्यांसाठी मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पनवेल एक्झिट बंद करण्यात आली आहे.

# विविध गुन्ह्यातील २५ जप्त वाहनांचा पोलीस करणार लिलाव



पनवेल, दि.१४ (वार्ताहर) : पनवेल शहर पोलीस ठाणे येथे विविध गुन्हयांमध्ये एकूण २५ वाहने जप्त करण्यात आलेली असून सदर वाहनांचे मुळ मालकांचा शोध घेतला, परंतु ते मिळून येत नाहीत. सदरच्या गाडया बऱ्याच कालावधीपासून पोलीस ठाणे आवारात पडून आहेत. त्यांचे मुळ मालक मिळून येत नसल्याने प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया केली जाणार आहे. तत्पुर्वी वरील नमुद वाहनांबाबत आजपर्यंत कोणीही सदर वाहनांचे मालकीबाबत दावा दाखल केलेला नाही. मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी कळंबोली यांचेकडे उपलब्ध वाहनांचे आरटीओ रजि.नंबर, इंजिन नंबर, चेसीज नंबरची पडताळणी केली असता सदर वाहनांचे मालक मिळून आले नाहीत. सदर गुन्हयातील जप्त वाहने ही भंगारात कश करून त्याचा लिलाव करण्याची मा. न्यायालयाने परवानगी दिली असून सदर वाहनांचा दिनांक १८/०२/२०२५ रोजी ११.०० वा. रोजी पनवेल शहर पोलीस ठाणे आवारात लिलाव करण्यात येणार असून त्यासाठी इच्छुकांनी तत्पुर्वी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे दुरध्वनी क. ८५९१४२४३५०वर संपर्क साधावा, असे आवाहन वपोनि नितीन ठाकरे यांनी केले आहे.

## निवडक

### गोडाऊनमधून कॉपर केबलची चोरी

**पनवेल :** गोडावूनमध्ये ठेवलेल्या कॉपर केबलची चोरी झाल्याची घटना तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रिओ इंन्फ्रा इक्युमेंट कंपनीच्या गोडावूनमध्ये घडली आहे.या कंपनीच्या पत्र्याच्या गोडावूनमध्ये ठेवलेल्या जवळपास ४० हजार रुपये किंमतीच्या कॉपर केबलची चोरी केल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### दुचाकीच्या अपघातात तरुणाचा मृत्यू

**पनवेल:** दुचाकीला भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू एक गंभीर जखमी झाल्याची घटना कामोठे येथे सर्व्हीस रोड येथे घडली आहे.मानसरोवर कॉम्प्लेक्समध्ये राहणारा प्रसाद हा त्याचा मित्र अनिल जाधव याच्या सोबत भटकंतीसाठी बाहेर पडला होता. ते सर्व्हीस रोडवरुन जात असताना एका अज्ञात वाहनाने त्यांच्या मोटार सायकला धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते दोघे गंभीररित्या जखमी झाले होते. त्यापैकी अनिल जाधव याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ट्रेलरच्या धडकेने चालकाचा मृत्यू

**पनवेल:** लोडींग अनलोडींगचे काम सुरू असताना एका ट्रेलरची धडक बसल्याने चालकाचा मृत्यू झाल्याची घटना सी.जे.डार्सल लॉजिस्टीक कंपनीच्या मोकळ्या मैदानात घडली आहे.संतोषकुमार भार्गव (४४) असे मृत इसमाचे नाव असून या प्रकरणी कळंबोली पोलिसांनी ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे

### गजानन महाराज प्रकट दिन सोहळा

**पनवेल :** श्री गजानन महाराज मंदिर ट्रस्ट गुरुपीठ नेरे श्री मंदिर वर्धापन दिन आणि श्रींचा प्रकट दिन सोहळ्याचे आयोजन २० फेब्रुवारी रोजी नेरे येथे करण्यात आले आहे यावेळी सकाळी सात ते नऊ श्री महाराज, श्री तुळजाभवानी व श्री मल्हारी मार्तंड देवता अभिषेक व महापूजा, सकाळी नऊ ते साडेनऊ श्री गजानन विजय ग्रंथ पहिला अध्याय वाचन, दहा ते बारा किर्तन व पुष्पवृष्टी सोहळा, त्यानंतर सायंकाळी पाच ते सात वाजेपर्यंत श्रींचा पालखी सोहळा आणि हरिपाठ, सात ते साडेसात आरती, साडेसात ते दहा वाजेपर्यंत महाप्रसाद आणि भजनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मोटरसायकलचोराला घेतले ताब्यात

**नवीन पनवेल :** रेल्वे कॉलनी तक्का येथून मोटरसायकल चोरणाऱ्या एकाला विष्णू नगर परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे जयसिंग यांची काळ्या रंगाची टीव्हीएस मोटर सायकल रेल्वे कॉलनी तक्का येथून चोरीला गेली होती. पनवेल शहर पोलिसांनी आरोपी अनिल गोरे (२५) याला ताब्यात घेतले.

## सीएथॉन मॅरेथॉनमध्ये ईपीआरचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतामध्ये प्रथमच सर्व सीए एकत्र येऊन सीए थॉन मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. खूप सुंदर आणि अविस्मरणीय असा हा सोहळा पार पडला , ज्यामध्ये अनेक दिग्गज सीए आले होते. या प्रसंगी अपर्णा शहा संस्थापित अभियान ईपीआर टीम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राजदूतानी हजेरी लावली आणि हा जनजागृतीचा संदेश पोहचवला.

ज्या प्रकारे आपण एक दिवस हा शारीरिक धाव घेवुन स्वतःला एवम समाजाला एक संदेश दिला की शरीराची सुदृढता किती महत्वाची आहे, त्याचप्रमाणे सर्व शारीरिक आणि मानसिकरित्या अजून प्रगल्भ विचार,आचार करणेअत्यंत गरजेचेआहे. खाणे, खेळणे, वाचणे हे जीवनात किती महत्वाचे आहे हे सर्व उपस्थित सीए आणि उपस्थित प्रेक्षक या मध्ये हा जनजागृतीचा आवाज पोहोचवण्यास ईपीआर टीमला यश आले. दुग्ध शर्करा योग म्हणजे सीए थॉन या नियोजित संस्थेने याखेळा वाचा अभियानाला समर्थनही दिले आणि व्यासपीठावर बोलावून सन्मानित ही केले.



**पनवेल : संत शिरोमणी रोहिदास जयंती उत्सवाच्या निमित्ताने चर्मकार समाज रायगड प्रतिष्ठान पनवेल तालुक्याच्या वतीने लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या वेळी पनवेल तालुका चर्मकार समाजाचे अध्यक्ष विजय मोहोकर, माजी नगरसेवक व रायगड जिल्हा चर्मकार संघटनेचे माजी अध्यक्ष अरविंद सावळेकर, लक्ष्मण कल्याणकर, प्रवीण मोहोकर, विलास उरणकर, भूषण कल्याणकर, सचिन उरणकर आदी उपस्थित होते**

## एकता महिला मंडळाच्या वतीने किर्ती समुद्र आणि वृषाली पाटकर यांना पुरस्कार प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एकता महिला मंडळाच्या वतीने समाजभान पुरस्कार डॉ. कीर्ती समुद्र, तर संस्कृती रक्षक पुरस्कार वृषाली पाटकर यांना राष्ट्रीय महिला दिनानिमित्त वीरमाता अनुराधा गोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी राष्ट्रपती समर्पण करणाऱ्या तसेच महिला दिवस अत्याचाराविरुद्ध आवाज उठवणाऱ्या विविध दुर्लक्षित महिलांवर अधोरेखित असलेला अज्ञात शलाका हा कार्यक्रम कार्यक्रमाचे आकर्षण ठरला.

समाजाप्रती जाणीव ठेवून उल्लेखनीय आणि आदर्शवतकार्य करणाऱ्या महिलेला कै निलाताई पटवर्धन स्मृतिप्रीत्यर्थ समाज भान पुरस्काराने, तर संस्कृती रक्षणाचे कार्य करणाऱ्या महिलेला काही उषाताई पेन्सिल स्मृतिप्रीत्यर्थसंस्कृती रक्षक पुरस्काराने दरवर्षी एकता महिला मंडळाच्या वतीने सन्मानित करण्यात येते. या वर्षी समाजभान पुरस्कार डॉ. कीर्ती समुद्र, तर संस्कृती रक्षक पुरस्कार नृत्य दिग्दर्शक, शिक्षक वृषाली पाटकर यांना आणि विशेष सन्मान पुरस्कार अनन्या जोशीला वीरमाता अनुराधा गोरे यांच्या हस्ते आणि शैलजा खाडीलकर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, पुष्प, रोप, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

कार्यक्रमाची सुरुवात अहिल्याबाई होळकर यांच्यावरील सुखदा घाणेकर यांनी गायलेल्या पोवाड्याने झाली. यानंतर राष्ट्रासाठी संघर्ष करणाऱ्या स्त्रीशक्ती वर आधारित अज्ञात शलाका या कार्यक्रमाचे विशेष सादरीकरण झाले. यामध्ये देशातील, विविध राज्यातील, भाषांतील विशेष भूमिका घेऊन इतिहास रचणाऱ्या विरांगनाची ओळख सादरीकरणातून करण्यात आली. उत्कृष्ट अभिनय, शब्दफेक, पार्श्वसंगीत, प्रकाश योजना यामुळे कार्यक्रमाने वेगळी उंची गाठली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एकता महिला मंडळाच्या अध्यक्ष सुनिता खरे यांनी केले. महिलांना बळ देण्याचे कार्य पुरस्कार प्रदान समारंभाद्वारे केले जाते, असे त्यांनी यावेळी सांगितले. वीरमाता अनुराधा गोरे यांनी पनवेलमध्ये अशा काम करणाऱ्या रत्नांची खाण असल्याचे सांगितले, तर अज्ञात शलाका यासारखे कार्यक्रम नेमका विचार लोकांपर्यंत पोहोचतात असे सांगितले.

कार्यक्रम अध्यक्ष शैलजा खालीलकर यांनी एकता महिला मंडळाच्या यापूर्वीच्या कार्याचा आणि त्यांच्या सहभागाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना राऊत यांनी केले तर सन्मानपत्राचे वाचन अपर्णा नाडगौडी यांनी केले. या वेळी एकता महिला मंडळाच्या उपाध्यक्ष विजय एरंडे, खजिनदार सुलक्षणा टिळक, वृषाली सावळेकर, कविता ठाकूर, विद्या चव्हाण, सुनिता कुंभार, संगीता लाड, स्वाती देसाई यांनी परिश्रम घेतले, उपस्थितांचे आभार निर्मला म्हात्रे यांनी मानले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाचे सांगता झाली.

## मराठा समाजातर्फे शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**पनवेल :** सकल मराठा समाज मंडळ खांदा कॉलनी तर्फे शिवजयंतीनिमित्त १५ ते १९ फेब्रुवारीपर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत

यामध्ये शनिवार दि.१५ फेब्रुवारी रोजी महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ व डॉ.नैना पटेल यांचे महिला आरोग्य मार्गदर्शन, सायं.४ ते ८ या दरम्यान. रविवार दि.१६ फेब्रुवारी रोजी भव्य रक्तदान शिबीर आयोजक कच्छ युवक संघ पनवेल सकाळी १० ते २ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ६ ते १० या दरम्यान मराठमोळा पोवाडा व शाहिरी गीतांचा कार्यक्रम सादरकर्ते रायगडभूषण, शिवभूषण मराठमोळा शाहिर वैभव घरत, सोमवार दि.१७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७.३० ते ८.३० चित्रकला स्पर्धा, मंगळवार दि.१८ फेब्रुवारी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

बुधवार दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी शिवप्रतिमेचे पूजन व शिववंदना, त्यानंतर भजन, मान्यवरांचे स्वागत व सत्कार, हरिपाठ, शिवप्रतिमेची शाही मिरवणूक, गुणगौरव बक्षिस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम मराठा भवन सेक्टर ९ खांदा वसाहत येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

# टाळ्या वाजवण्यापेक्षा दुसऱ्यांना टाळ्या वाजविण्यास उद्युक्त करा -डॉ. अहिरे

**पनवेल: प्रतिनिधी**

प्रेक्षकात बसून दुसऱ्यासाठी टाळ्या वाजविण्यापेक्षा स्वतः मान्यवर होऊन दुसऱ्यांना टाळ्या वाजविण्यास उद्युक्त करा. असा उपदेश नामवंत लेखक,व्यवसाय प्रशिक्षक डॉ. रत्नाकर अहिरे यांनी केला.

येथील चांगु काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्था आणि चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज, नवीन पनवेल (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच आयोजित केलेल्या' जर्नी फ्राम सिग्नेचर टू ऑटोग्राफ'या कार्यक्रमांतर्गत प्रेरणादायी व्याख्यानाच्या वेळी ते बोलत होते. वीरस्वामी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था आणि लिटल किड्स आयडीयल स्कूल, नवीन पनवेल हे कार्यक्रमाचे सह आयोजक होते .तर कार्यक्रमाची संकल्पना एन.डी.खान यांची होती.



डॉ. रत्नाकर अहिरे पुढे म्हणाले,पुस्तक, चित्रपट, चारचौघात आपला झालेला अपमान,प्रेरणादायी भाषण यामुळे आपले आयुष्य बदलू शकते. त्यातील सकारात्मक बदलामुळे आपल्या आयुष्याला निराळी दिशा मिळते. अपेक्षित उंची गाठण्यासाठी पाया देखील तेवढाच मजबूत पाहिजे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर केवळ डोळेच नव्हे तर पाची इंद्रिये खुली ठेवली पाहिजेत.माणसाने रुचेल व पचेल तेवढेच खावे.मानपान, अहंकार तसेच क्षुल्लक गोष्टींचा बाऊ करू नका. आत्मविश्वास वाढवायचा असेल तर जी गोष्ट आयुष्यात पूर्वी कधीच केली नसेल ती केली पाहिजे.

जीवनात नेहमी नावीण्य पाहिजे. घर ते कार्यालय एकाच रस्त्याने जाण्यापेक्षा अधून मधून वेगळ्या रस्त्याने जा.जीवनात काहीतरी वेगळे करा.आतली मनस्थिती आपण चांगली ठेवली तर बाहेरची कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी ती अनुकूल होऊ शकते.'माता आणि माती'याकडे लक्ष ठेवा.इथे फक्त वेलांटीचा फरक आहे. कोणतीही कलाकृती प्रथम कलाकाराच्या कल्पनेत व नंतर प्रत्यक्षात साकार होते. आपल्या निरर्थक आयुष्याला आपल्या कर्तृत्वाने अर्थ प्राप्त होतो. जी माणसं मनापासून ऐकतात त्यांचे प्रश्न लवकर सुटतात.

आपले म्हणणे अधिक स्पष्ट करण्यासाठी त्यांनी गरुडासारख्या पक्ष्यांच्या,हत्ती- सिंहासारख्या प्राण्यांच्या गोष्टींचा, विविध आठवणी,किस्से यांचा सढळपणे उपयोग केला. आपल्या वापराल्या अनेक वस्तूंचा उपयोग करून त्यांनी आपले म्हणणे पटवून दिले. प्रसंगी त्यांनी मुकाअभिनयाचा प्रभावी वापर केला. सुमारे दोन- अडीच तास प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन त्यांचे भाषण ऐकत होते. कॉलेजचे सभागृह प्रेक्षकांनी तुडुंब भरले होते.टाळ्यांच्या कडकडाटामधून प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत होता. कार्यक्रमापूर्वी सौ. सुरेखा भुजबळ यांच्या 'सूर संध्या संगीत अकॅडमी' मधील बालचमूंनी विविध समर्पक गीतांचे सुरेल सादरीकरण केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. संस्थेचे संस्थापक व कार्यक्रमाचे संयोजक एन.डी. खान यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रुपा भामरे यांनी नेहमीच्या सफाईने केले. कार्यक्रमाची संकल्पना एन.डी. खान यांची होती.संघटक वीरस्वामी शैक्षणिक आणि सामाजिक विकास संस्थेचे संजय हिरेमठ होते.तर समन्वयक लिटल आयडियल किड्स स्कूलच्या प्राचार्या सौ.पूनम गुप्ता व महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेच्या कार्यकारी सभासद सौ. सलमा खान होत्या. कार्यक्रम स्थळी सुधाकर पाटील निवृत्त सहकारी अधिकारी, एकनाथ खुल्लम निवृत्त पोलीस अधिकारी, कॅप्टन मनोज भामरे, पत्रकार मिलिंद पाटील, मंगला बिराजदार ,सेजल जाधव,अनिल बिराजदार,पूजा मंडोरा, भाग्यश्री भुजबळ, सलीम मुनवर,केशव कांबळे ब्रेन डेव्हलपमेंट अकॅडमी चे विभांडीक सर व इतर अनेक प्रतिष्ठित उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकुमार ताकमोगे.सौ.मीना ताकमोगे,सौ.शीतल भामरा,सौ. मृणाल पवार.सौ.सुजाता चोरगे,सौ. क्षमा तिवारी यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शनानंतर या स्फूर्तीदायक कार्यक्रमाची सांगता झाली.

## संपादकीय

# जिभेला घाला लगाम

समाजमाध्यमांचे पेव फुटल्यानंतर कोण काय बोलेल याचा काही नेम राहिला नाही. तरुणाई मुक्त जाणिवांची असणे हे निश्चितच चांगल्या समाजाचे लक्षण आहे. परंतु जाणिवा मुक्त असल्या तरी त्या स्वैर असता कामा नयेत. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यात जमीन-आस्मानाचा फरक आहे.

**परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाने भारतीय नागरिकांना वेगवेगळ्या प्रकारचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. त्यामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य महत्त्वाचे मानले जाते. तथापि या स्वातंत्र्याबरोबरच येणारी जबाबदारी कोणालाच टाळता येणार नाही. समाजमाध्यमांच्या जगामध्ये नुकतेच एक प्रकरण घडून गेले. त्याचे दुष्परिणाम यापुढेही जाणवत राहणार आहेत. रणवीर अलाहाबादिया, समय रैना ही समाजमाध्यमांच्या जगतातील लोकप्रिय नावे आहेत. यांच्या युट्यूब वाहिन्या अनेक देशांमध्ये आवडीने ऐकल्या-पाहिल्या जातात. एखाद्या विषयाला थेट भिडणे, चटपटीत चतुर भाष्य करणे अशा अनेक वैशिष्ट्यांनी युक्त असलेले अनेक कार्यक्रम किंवा मुलाखती अलाहाबादिया, रैना या मंडळींनी आजवर घेतल्या आहेत, त्याला समाजमाध्यमांच्या परिभाषेत मिलियन म्हणजे दशलक्षपेक्षा अधिक श्रोते किंवा प्रेक्षक मिळाले आहेत. निवडणुकीच्या काळात याच युट्यूब विश्वाच्या महासिताऱ्यांना राजकीय नेत्यांनी कामाला लावले होते. चांगला आशय (कंटेंट) असला तर लोकाश्रय देखील आपोआप मिळतो असे रणवीर अलाहाबादिया या तरुण युट्यूब सिताऱ्याने मध्यंतरी म्हटले होते. रणवीर अलाहाबादियाने चांगला कंटेंट दिला तेव्हा त्याचे भरभरून कौतुक झाले. एखाद्या चित्रपट सिताऱ्याला मिळावे असे ग्लॅमर त्याला मिळाले. परंतु काही दिवसांपूर्वी 'इंडियाज गॉट लेटंट' या युट्यूब कार्यक्रमाअंतर्गत याच अलाहाबादियाने अत्यंत विकृत टिप्पणी करतानाच जे गलिच्छ उद्गार काढले, त्यामुळे सारा देशच जणु हादरून गेला. अलाहाबादियाने एका स्पर्धकाला आपल्या पालकांविषयी जो प्रश्न विचारला, तो इतका बीभत्स होता की तो पुन्हा सांगता येण्याजोगा देखील नाही. कुठल्याही सुजाण आणि सुसंस्कृत माणसाच्या अंगावर शहारा येईल असेच त्याचे उद्गार होते. मुक्त अभिव्यक्तीच्या नावाखाली हे असले थोतांड खपवून घेणे अशक्यच आहे. साहजिकच अलाहाबादिया आणि त्याचा जोडीदार समय रैना यांच्या विरोधात पोलिसांनी कारवाई सुरू केली. इतकेच नव्हे तर समय रैनाला आपला युट्यूब चॅनल बंद करावा लागला आणि वादग्रस्त कार्यक्रमाचे सारे भाग डीलीट करावे लागले. रणवीर अलाहाबादियाने सपशेल माफी मागण्याचा मार्ग पत्करला. तरीही त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई होणारच आहे. भूतकाळात कितीही चांगला कंटेंट दिला असला तरी या एकाच वेळी केलेल्या 'पापा'मुळे हे दोन्ही युट्यूब सितारे अस्ताला जातील की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. रणवीर अलाहाबादियाने जी मुक्ताफळे उधळली, ती एकमेवाद्वितियम् अशी नाहीत. समाजमाध्यमांवर सभ्यतेचे उल्लंघन अनेकदा होताना दिसते. काही वर्षांपूर्वी 'एआयबी रोस्ट' या कार्यक्रमाद्वारे सिनेदिग्दर्शक करण जोहर याने देखील अशाच मर्यादा ओलांडल्या होत्या. पोलिसांच्या कारवाईनंतर तो सुतासारखा सरळ आला. समाजमाध्यमांवरील या वृत्ती वेळीच रोखल्या नाहीत तर येणाऱ्या पिढ्यांना विषारी विचारांचे परस्पर दान केल्यासारखेच होईल. समाजमाध्यमांवरील टीकाटिप्पणीला लगाम घालता यावा यासाठी कडक कायद्यांची तरतूद करायला हवी. नुसते कायदे कडक करून भागणार नाही तर त्या कायद्यांची अंमलबजावणी देखील विनाविलंब करायला हवी. न्यायसंहितेमध्ये हा प्रश्न ऐरणीवर येणे गरजेचे आहे.**

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामुळे स्वयंरोजगारास आधार

युवक-युवतींच्या सर्जनशीलतेला वाव मिळवून देवून ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सुक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना सुरु केली. नवउद्योजकांच्या प्रकल्प उभारणीस राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य देवून त्यांच्या स्वप्नांना बळ देणे हा या योजनेचा उद्देश. लातूर जिल्ह्यात गेल्या सुमारे पाच वर्षात जवळपास एक हजार ७९ युवक-युवतींना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. या योजनेतून त्यांना सुमारे १८ कोटी ८३ लक्ष रुपयांचे अनुदान (मर्जीन मनी) मंजूर करण्यात आले आहे.

**अशी होते लाभार्थी निवड**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीने केली जात आहे. या योजनेसाठी विकसित केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज केल्यानंतर जिल्हास्तरीय समितीमार्फत या अर्जाची छाननी करून मान्यता देण्यात आलेले प्रस्ताव शिफारसीसह बँकेकडे पाठविले जातात. प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून बँक कर्ज मंजुरीबाबत निर्णय घेते. बँकेने मंजूर केलेल्या प्रकल्प किंमतीस पात्र अनुदानाची रक्कम ही लाभार्थ्याच्या बँक खात्यावर जमा होते. प्रस्ताव सादर करण्यासाठी आवश्यक प्रकल्प अहवाल तयार करण्याची सुविधाही संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वर्षे वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतून अर्थसहाय्य देण्यात येते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, अपंग, माजी सैनिक यांच्यासाठी वयामध्ये ५ वर्षांची शिथिलता देण्यात आली आहे. दहा लाखांवरील प्रकल्पासाठी अर्जदार किमान इयत्ता सातवी उत्तीर्ण असणे गरजेचे आहे, तर २५ लाखांवरील प्रकल्पासाठी अर्जदारा किमान इयत्ता दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

प्रक्रिया व निर्मिती क्षेत्रातील उद्योगांसाठी ५० लाख रुपयांची, तर सेवा अथवा कृषि पूरक क्षेत्रातील उद्योगांसाठी १० लाख रुपयांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. वैयक्तिक मालकी, भागीदारी तत्वावर किंवा वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेल्या बचत गटांमार्फत उभारण्यात येणाऱ्या उद्योगांसाठी या योजनेतून अर्थसहाय्य देण्यात येते.

**प्रकल्प किमतीच्या १५ ते ३५ टक्केपर्यंत मिळते अनुदान**

सर्वसाधारण प्रवर्गातील नवउद्योजकाला शहरी भागासाठी १५ टक्के अनुदान, तर ग्रामीण भागासाठी २५ टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. तसेच शहरी भागासाठी ७५ टक्के व ग्रामीण भागासाठी ६५ टक्के बँक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. उर्वरित १० टक्के रक्कम ही लाभार्थ्याने स्वतः गुंतवणूक करणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग, माजी सैनिक लाभार्थ्यांना शहरी भागामध्ये २५ टक्के, तर ग्रामीण भागात ३५ टक्के अनुदान देय आहे. तसेच शहरी भागात ७० टक्के आणि ग्रामीण भागात ६० टक्के बँक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. ५ टक्के रक्कम स्वतः गुंतविणे आवश्यक आहे.

**आवश्यक प्रमुख कागदपत्रे**

जन्म दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेसंबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे, आधारकार्ड, नियोजित उद्योग/व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल.

जातीचे प्रमाणपत्र (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी)

विशेष प्रवर्गासाठी पूरक प्रमाणपत्र (दिव्यांग, माजी सैनिक).

वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना.

स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र.

अर्ज व प्रकल्प उभारणीअंतर्गत टप्पे

१) जिल्हास्तरावर उचएत्रझ पोर्टलद्वारे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

२) महाव्यवस्थापक यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी तयार केली जाते.

३) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड करून विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस केली जाते.

४) बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक शहनिशा करून कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय घेण्यात येतो.

५) प्रस्तावास बँक मंजुरी असल्यास बँकेकडून सादर केलेल्या प्रस्तावांची छाननी करून शासनाच्या अनुदानाला उद्योग संचालनालयाकडून मंजुरी देण्यात येते.

६) अर्जदाराने स्वतःची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजूर कर्ज रक्कमेचे पूर्ण वितरण करण्यात येते.

**लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी योजनेचा लाभ घ्यावा**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्यातील युवक-युवतींच्या उद्योग, व्यवसायाला अर्थसहाय्य करण्यासाठी उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन आणि जिल्हा उद्योग केंद्र प्रयत्न करीत आहे. या योजनेतील कर्ज प्रकरणे मंजुरीचे उद्दिष्ट पूर्ण करून उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्ह्याला राज्य शासनाने पुरस्कार देवून गौरविले आहे. यावर्षीही जिल्ह्याला प्राप्त झालेले ४८० कर्ज प्रकरणांचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींना या योजनेचा लाभ देवून आपल्या जिल्ह्याला राज्यात अग्रेसर ठेवण्याचा प्रयत्न आहे.

**-प्रवीण खडके, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर**

# सखी, मला भासले जे.....

सखी हा निशा वर्तक यांनी रेखाटलेल्या कवितांचा काव्यसंग्रह माझ्या हाती आला आणि तहानलेल्या माणसाने गटागटा पाणी प्यावे, तसा मी तो वाचून काढला. निशा हिने कविता रेखाटल्या आहेत, असे म्हणण्याचे कारण, चित्रकार कॅनव्हासवर जसे कुंचल्याने फराटे मारत, एक सर्वांग सुंदर चित्र तयार करतो, तसे शब्दाचे अवडंबर न माजविता, प्रतिभेच्या अलवार कुंचल्याने, साहित्याच्या कॅनवासवर निशाने कविता चितारली आहे. होय, होय. लिहिली नव्हे तर चितारली आहे. तिच्या कविता वाचताना एक सर्वांग सुंदर चित्र असण्याचा आभास तयार होतो आणि आपण कवितेत रमून जातो. कविता आपल्या समोर चक्क प्रकट होते आणि काळजाला हात घालते.

प्राजक्त गर्भार राहणे ही प्रतिभा सामान्य माणसाच्या आकलना पलीकडे आणि कुठल्याही कवीच्या प्रतिभेपलीकडे पोहचून प्राजक्ता इतकी नाजूक होऊन जाते. प्राजक्त गर्भार राहणे आणि तो रिता होणे, ही कल्पना प्रसवणे, हे कवयित्रीचे नाजूक मन किती संवेदनाशील आहे, हे सांगून जाते. 'माझे माहेर म्हणजे श्रावणाची सर' असे माहेरचे वर्णन माझ्या वाचनात तरी आजपर्यंत आलेले नाही. श्रावणाची सर सुखावणार नाही, असा माणूसच विरळा आणि माहेरची आठवण सुखावणार नाही, अशी सासुरवाशीणदेखील विरळी. माहेरचा लळा आणि कौतुक असलेली कवयित्री, गनिमाच्या छातीवर बंदूक रोखावी, असा समाजाच्या छातीवर रोखठोक प्रश्न रोखते, तो म्हणजे 'पाठवणी केवळ स्त्रीची का व्हावी लग्नाच्या वेळी? समाजाचे ऋण फेडताना, कुणीतरी असावं ही कविता ती रेखाटते आणि तीच आपल्याला विशण्ण करून जाते. जितक्या सहजपणे निशा निसर्ग चित्र उभे करते, तितक्याच शौर्याने तिच्या शब्दांची तलवार, अनेक बाजारू मनांना रक्तरंजित करते.

प्रियकराच्या आठवणीने बेजार झालेली विरहोत्कंठीता, ज्या कुंचल्याने ती रंगवते, त्याच कुंचल्याने ती विरहणीचे दुःख देखील चितारते. विठ्ठलाला साद घालताना तिच्या लेखणीची ज्योत होते तर 'कुणीतरी असावे पाठीवर थाप मारणारे' म्हणताना तिची लेखणी अनाथ होते.

पहाट हा निशाच्या कवितेचा आत्मा असावा, कारण पहाटेचे वर्णन ती शब्दानेदेखील गुलाबी रंगवते. निसर्ग चित्र चितारताना तिची लेखणी जरा जास्तच गुलाबी असते. तर फुलांशी तिच्या शब्दाचे अद्वैत नाते असल्याचे दिसते.

संग्रहात असलेल्या तिच्या साऱ्याच कविता छंदोबद्ध असून, त्या कुठल्या ना कुठल्या वृत्तात बंदिस्त झाल्या आहेत. निशाच्या कविता इतक्या लईत वाचता येतात, की मुक्तछंदातील कवितासुद्धा छंदोबद्ध असल्याचा प्रत्यय येतो.

कवयित्री निशा वर्तक हिच्या पहिल्यावहिल्या 'सखी' या काव्यसंग्रहाला, क्षितिजाहून मोठे यश लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना आणि तिचे मनापासून अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा!

**-प्रकाश राणे**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲप युजर्सना हॅकर्सचा धोका; २४ देशांमध्ये टार्गेट

तुम्ही व्हॉट्सॲप युजर्स असाल तर ही बातमी नक्की वाची. तुम्हालाल माहिती आहे का की, कधीही तुमची माहिती चोरीला जाऊ शकते किंवा तुमचे नुकसान होऊ शकते. कारण, व्हॉट्सॲपच्या झिरो क्लिकच्या माध्यमातून हॅकर्स कोणत्याही लिंकशिवाय हॅकिंग करत आहेत. यामुळे तुमच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. धक्कादायक बाब म्हणजे तुम्ही लिंकला क्लिक करा किंवा नको करा, तुम्ही या हॅकर्सच्या टार्गेटवर कधीही येऊ शकते. यामुळे सध्या सगळीकडे चिंतेचे वातावरण आहे.





तुम्ही व्हॉट्सॲप युजर असाल तर तुम्हाला माहित असेल की जगभरातील व्हॉट्सॲप युजर्सना हॅकर्स अटॅकचा धोका आहे. हे हॅकर्स इतके प्रगत आहेत की ते ॲपच्या कडक सुरक्षेत घुसून तुमचं नुकसान करू शकतात. या हॅकर्सच्या माध्यमातून हॅकर्स सायबर हेरगिरी करत असून त्यांनी किमान २४ देशांतील युजर्सना लक्ष्य केले आहे. एकट्या इटलीमध्ये सात प्रकरणे समोर आली आहेत.

व्हॉट्सॲप युजर्सला लक्ष्य करण्यासाठी हल्लेखोर इस्रायली स्पायवेअरचा वापर करत आहेत. हे स्पायवेअर इस्रायली सर्व्हेलन्स फर्म पॅरागॉन सोल्युशन्सशी संबंधित आहे. याचा वापर पत्रकार, कार्यकर्ते आणि नागरी समाजाच्या सदस्यांचे व्हॉट्सॲप अकाऊंट हॅक करण्यासाठी केला गेला आहे. यात झिरो क्लिक हॅकिंग तंत्राचा वापर करण्यात आला आहे. म्हणजेच लिंकवर क्लिक करा किंवा न करा, हल्लेखोर आपलं काम करतील. हॅकिंगचा हा प्रकार अत्यंत धोकादायक असल्याचे सांगण्यात आले आहे. कारण यामुळे पारंपरिक सुरक्षा व्यवस्था सहज मोडीत निघते. व्हॉट्सॲपची पॅरेंट कंपनी मेटानेही याला दुजोरा दिला आहे. स्पायवेअर व्हॉट्सॲप युजर्सला टार्गेट करत असल्याचे कंपनीला आढळले असून कंपनीने तातडीने इटलीच्या नॅशनल सायबर सिक्युरिटी एजन्सीला याची माहिती दिली.

तुमचे व्हॉट्सॲप त्वरित अपडेट करा. अतिरिक्त सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी टू-स्टेप व्हेरिफिकेशन सक्रिय करा.कोणताही स्पॅम कॉल उचलू नका. कोणत्याही मेसेजला रिप्लाय देऊ नका. वरील गोष्टी तुम्ही फॉलो केल्यास हॅकर्सपासून वाचू शकतात. व्हॉट्सॲपच्या झिरो क्लिकच्या माध्यमातून हॅकर्स कोणत्याही लिंकशिवाय हॅकिंग करत आहेत. त्यामुळे सतर्क राहणे गरजेचे आहे.

# कवी, लेखक, कादंबरीकार नामदेव ढसाळ



## निमित्त

नामदेव लक्ष्मण ढसाळ हे कवी, लेखक, कादंबरीकार आणि नाटककार अशा विविध पैलूंनी प्रसिद्ध असणारे दलित चळवळीमधले ज्येष्ठ नेते. मुंबईतल्या अत्यंत गरीब आणि बकाल भागात बालपण घालवल्याने त्यांनी दारिद्र्य आणि ससेहोलपट जवळून पाहिली आणि आपल्या विशिष्ट भाषेतून त्यांनी ते दलितांचे आयुष्य शब्दबद्ध केले. आजच्याच तारखेला (१५ फेब्रुवारी) १९४९ रोजी त्यांचा जन्म झाला होता.

नामदेव ढसाळ यांचा जन्म पुणे जिल्ह्यात खेड तालुक्यातील कनेरसरशेजारच्या पूर या खेड्यात झाला. त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने लहानपणीच ते वडिलांसोबत मुंबईला आले. मुंबईतील गोलपीठा या वेश्यावस्ती असलेल्या भागातील झोपडपट्ट्यांमध्ये त्यांचे बालपण गेले. त्यांचे वडील खाटीक होते. नामदेव ढसाळांनी मुंबईमध्ये अनेक वर्षे टॅक्सी चालवली. ढसाळांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर मोठा प्रभाव होता. त्यांनी काव्य, गद्य, वृत्तपत्रांतील स्तंभलेखन यातून आंबेडकरांचे क्रांतिकारी विचार मांडले. त्यांच्या क्रांतिकारी साहित्याची दखल जागतिक पातळीवरही घेतली गेली.

१९७३मध्ये नामदेव ढसाळ यांचा पहिला कवितासंग्रह गोलपिठा प्रकाशित झाला. मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले हा माओवादी विचारांवर आधारित, तर प्रियदर्शिनी हा त्यांचा इंदिरा गांधी यांच्या विषयीचा कविता संग्रह आहे, तसेच खेळ हा शृंगारिक कवितांचा संग्रह आहे.

ढसाळ यांनी साहित्याच्या माध्यमातून दलितांच्या व्यथा, वेदनांना प्रसिद्धी दिली. महाराष्ट्र आणि भारताला प्रभावित करणाऱ्या 'दलित पँथर' या आक्रमक संघटनेचे ते संस्थापक अध्यक्ष होते. या संस्थेची स्थापना त्यांनी १९७२मध्ये दलित चळवळीतील समवयस्क सहकाऱ्यांच्या व साहित्यिकांसह केली. या संघटनेवर अमेरिकेतील ब्लॅक पँथर चळवळीचा प्रभाव होता. या संघटनेद्वारा ढसाळ यांनी दलितांच्या अनेक प्रश्नांवर उग्र आंदोलने केली व तत्कालीन सरकारांना दलित हिताच्या भूमिका घेण्यास भाग पाडले. कालांतराने या चळवळीत फूट पडल्यावरही ढसाळ हे दलित पँथरमध्येच राहिले. मराठवाडा विद्यापीठ नाम विस्तारमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दलित चळवळीला त्याचे महत्त्वाचे योगदान आहे.


नामदेव ढसाळ हे १९६०नंतरच्या मराठी कवींमधील प्रमुख कवी समजले जातात. त्यांनी विशिष्ट शैलीने मराठी कवितेत मोलाची भर घातली. त्यांनी भाषिकदृष्ट्या प्रमाण मराठी भाषेपेक्षा वेगळी भाषा वापरली. त्यांच्या लिखाणावर लघुनियतकालिकांचा, मनोहर ओक यांचा तर काही प्रमाणात दिलीप चित्र्यांचा प्रभाव दिसतो. त्यांच्या कृतींमध्ये वेदना, विद्रोह व नकार हा स्थायीभाव आहे.

नामदेव ढसाळ आयुष्याची शेवटची अनेक वर्षे मायस्थेनिया ग्रॅव्हीज या दुर्धर आजाराने ग्रस्त होते. याशिवाय त्यांना कॅन्सरचा आजारही जडला होता. १३ जानेवारी २०१४ रोजी त्यांना मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. १५ जानेवारीला पहाटे चारच्या सुमारास त्यांचे निधन झाले. निधनानंतर त्यांच्या स्मृती तेवत ठेवण्याच्या इराद्याने समविचारी मित्रांनी नामदेव ढसाळ स्मृती गौरव समितीची स्थापना करून एकूण आयुष्याला सलाम करणारा सारे काही समष्टीसाठी अभिवादनपर कार्यक्रम दरवर्षी १५ जानेवारीला मुंबईत होतो. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात








## आरोग्य प्रहर

# धावल्याने शरीराला होतात 'हे' फायदे, जाणून घ्या..

पिळदार शरीर आणि उत्तम आरोग्य ठेवण्यासाठी धावण्याची अत्यंत गरज असते. पण धावतानाही काही गोष्टींची काळजी घेणे खूप गरजेचे असते. धावताना वेग किती असावा, किती वेळ धावावे, तसंच आरोग्याच्या दृष्टीने चांगला रिझल्ट मिळवण्यासाठी धावताना सावधानताही बाळगावी लागते. वेगाने धावल्याने शरीराला कोणते फायदे होतात? तसंच धीम्या गतीने धावून लांबचे अंतर गाठल्यास काय फायदे होतात? याबाबत डॉ. सुधीर कामत यांनी सल्ला दिला आहे. धावणे म्हणजे एक आदर्श आहे, असं कामत यांनी म्हटलं आहे.



डॉ. कामत यांनी ट्वीटरवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलंय, लाँग रन केल्यामुळं शरीराला अनेक फायदे होतात. आरोग्य निरोगी राहण्याबरोबरच शरीर पिळदार राहतं. जोरात धावण्यापेक्षा हळू धावणे नेहमीच फायदेशीर ठरते. कमी वेगात धाऊन जास्त अंतर पार करणेही आरोग्यास फायदेशीर असते. डॉक्टरांनी धावण्याचा सल्ला दिल्यानंतर एका ट्वीटर युजरने त्याचा अनुभव शेअर करत ट्वीटला रिप्लाय केलं. राधाक्रिष्णन यांनी ट्वीटरवर रिप्लाय करून म्हटलं, आज मी माझा पेस ७.०५ ते ७.४५ पर्यंत कमी केला. हर्ट रेटही १४३ पर्यंत झाला. धन्यवाद सर.

आरोग्यविषयक समस्यांबाबत डॉ. आर आर दत्ता यांनीही सल्लामसलत केली आहे. खूप जास्त व्यायाम केल्यावर काही लोकं व्यायाम करताना खाली पडतात. खूप मेहनत घेणे सर्वच गोष्टींसाठी फायदेशीर नसते. वेगानं धावल्यानेही शारीरिक फायदे होतात. पण ज्या लोकांना उच्च रक्तदाब आहे, त्यांनी वेगानं धावणे टाळावे. अशा व्यक्तींना जोरात धावल्याने शरीरिक समस्येला सामोरं जावं लागू शकतं. शरीर किती मजबूत आहे आणि किती कमकुवत आहे, हे तुम्हाला नेहमीच्या आरोग्य तपसणीत माहितंच होतं. तुम्हाला रक्त दाबाचा त्रास असेल, तर काळजीपूर्वक व्यायाम करा. तुम्ही जोरात धावण्याऐवदी चालू शकता. दररोज एक तास चालल्याने काही लोकांनी वजन कमी केल्याची अनेक उदाहरणं समोर आहेत. धावण्याचा वेगाची मर्यादा ठेवा. योग्य पद्धतीने व्यायाम कसा करावा, यासाठी नेहमीच आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

वैज्ञानिकांच्या मते रोज केवळ सात मिनिटे हळूहळू धावण्याने आरोग्यास फायदा होतो. जे लोक धावण्याचा व्यायाम करीत नाहीत त्यांच्या तुलनेत तो व्यायाम करणाऱ्यांना हृदयविकार व पक्षाघातने मृत्यू येण्याची शक्यता कमी होते.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर पाच वाहनाचा विचित्र अपघात

## सिमेंट बल्कर, दोन टेम्पो, ट्रक, आणि कार कंटेनर अपघातघातग्रस्त



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर आज शुक्रवारी पहाटे सिमेंटचा बल्कर टँकरचे ब्रेक फेल झाल्याने त्याने समोरील दोन टेम्पो, एक ट्रक आणि कार कंटेनर या चार वाहनांना जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला,

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरून पुण्याहून मुंबई कडे सिमेंट बल्कर टँकर क्रमांक (ज्ञ- ३२ ऊ७६३३ )हा चालक हनुमंत कृष्णाप्पा मुनवले (वय २९ रा सिंदगी बिजापूर कर्नाटक) हा सिमेंट बाल्कर टँकर घेऊन जातं असताना तो बोरघाटात खोपोली एक्सिट जवळ नवीन बोगद्यात आला असता त्याचे ब्रेक फेल झाल्याने त्याने समोरील चालणाऱ्या दोन टेम्पो आणि एका ट्रक आणि एका कार कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली,

तर या अपघातात आयसर टेम्पो क्रमांक (MH ४२ CE ५३८८) हा तिसऱ्या लेन वर पलटी झाला, या अपघातात, सिमेंट बल्कर दोन टेम्पो एक ट्रक आणि एक कार कंटेनर अश्या एकूण पाच वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे, या अपघातात सिमेंट बल्कर टँकरच्या चालकाच्या पायाला किरकोळ दुखापत झाली आहे, या अपघातात नंतर मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती,


सगळी वाहने अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या साहाय्याने बाजूला घेऊन एक्सप्रेस वेवरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

## खोपोली-पाली मार्गावर एक जण ठार, दुसरा गंभीर

**खोपोली : प्रतिनिधी**

पाली-खोपोली मार्गावर शुक्रवार रात्री एका ट्रकने समोरील दोन दुचाकिना जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून, या अपघातात एक मोटार सायकल चालक जागीच ठार, झाला असून एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे,

पाली खोपोली महामार्गांवरून मोटार सायकल चालक ऋतिक रवींद्र महाडिक (रा बदलापूर) व पल्सर चालक स्वप्नील संतोष आमडोस्कर (वय २४ रा माटुंगा) हे पाली बाजूकडून खोपोली कडे येत असताना पालीकडे जाणारा ट्रकने दुरशेत गावाजवळ चालक गुड्डू कुमार याचे ट्रक वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील दोन्ही मोटार सायकलला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला.



## दांड-रसायनी रस्त्यावर महानगर गॅस पाईपलाईन खोदकामामुळे अपघातांत वाढ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-आपटा रस्त्यावर महानगर गॅसच्या लाईनच्या कामामुळे रसायनीकर त्रस्त झाले असून या गॅसच्या लाईनच्या कामामुळे ठिकठिकाणी अपघात होण्याच्याप्रमाणात वाढ झाली आहे. दांड-रसायनी रस्त्यावरील रिस, गुरूद्वार, मोहोपाडा याठिकाणी महानगर गॅसच्या लाईनचे काम चालू असून वाहनचालकांना या रस्त्यावरुन वाहन चालविताना समस्या निर्माण होत आहेत.

सायंकाळनंतर बाईकस्वारांच्या अपघातात वाढ झाली असून अनेकांना गंभीर दुखापती झाल्या आहेत. तर सेबी वळणावरही रस्त्याच्या मोरीचे काम सुरु आहे.या कामामुळे दोन - तिन दिवसांत एखाद्या तरुणाला आपला जागीच जीव गमवावा लागतो आहे.तर या कामामुळे सेबीवरुन येणारी वाहने तसेच



मोहोपाड्याहून चांभार्लीकडे जाणारी वाहने यांना वळण असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

सध्या दांड रसायनी रस्त्याचे डांबरीकरण व रहदारीच्या थांब्याशेजारी कॉक्रीटीकरण झाले आहे, परंतु महानगर गॅस पाईपलानचे संथगतीने काम आणि सेबी वळणाजवळील मोरीचे काम सुरु असल्याने या रस्यावर अपघातांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. इतरत्र पडलेल्या मातीमुळे नागरिकांना धुळीचा सामना करावा लागत आहे.

## प्रफुल विचारे यांना पुरस्कार

**चौक :** ग्रुप ग्रामपंचायत वावर्लेचे माजी सरपंच प्रफुल विचारे यांचा आदर्श राजकिय व्यक्तिमत्व पुरस्काराने रायगड प्रेस क्लबच्या वतीने सन्मान करण्यात आला. खोपोलीत प्रेस क्लबच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त खोपोली येथे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, प्रशासकीय, बचत गट, विविध संस्था, पत्रकार आदींचा पुरस्काराने सन्मान झाला.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender Specification.**

| | |
|---|---|
| Tender No. : E-Tender -01/ 2025-26<br>**Name of Tender :** Re-Tender for providing daily sweeping/ cleaning services alongwith cleaning materials at office, godown & yard area of Major Stores, Panvel for the period 01.04.2025 to 31.03.2026.<br>**Tender Fee :- Rs. 500 /- + applicable GST**<br>**RFx No.- 7000034949** | **Online Downloading the RFx :** Dt.15.02.2025, 00:00 Hrs. to 24.02.2025, 23:59 Hrs.<br>**Online Submission of the RFx :** On or Before Dt. 24.02.2025, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx** : Dt. 25.02.2025, at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid:** Dt. 25.02.2025 at 15:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :-**https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: - The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer, Major Stores, Panvel**


## विहूर ग्रामपंचायतीमध्ये आदिवासी लोकांना विविध दाखल्यांचे वाटप



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील विहूर ग्रामपंचायत हद्दीमधील आदिवासी पाड्यातील लोकांना विविध दाखले मिळावेत यासाठी ग्रामपंचायत मार्फत विविध दाखले देण्याचा उपक्रम राबवण्यात आला.

तहसीलदार रोहन शिंदे, यांनी स्वतः स्वारस्य दाखवत या समाजास विविध दाखले मिळावेत यासाठी सर्व जबाबदार अधिकाऱ्यांचा लवाजमा सहीत सर्व लागणाफ्या अर्ज व साहीत्य घेऊन ते वीहूर ग्रामपंचायत येथे स्वतः हजर राहून दिवसभराची मेहनत करून जास्तीत जास्त आदीवासी बांधवांना या योजनेचा ताबडतोब फायदा करून दिला.

या शिबिरातून आधार कार्ड 'व जातीचे दाखले या दोन्ही गोष्टी अगदी सहज उपलब्ध करुण दिल्या या कार्यक्रमाला आदीवासी बांधवांनी सुद्धा उत्स्फूर्त प्रतीलाद दिला.

या कार्यक्रमासाठी तहसिलदार रोहन शिंदे ,पुरवठा अधीकारी निखील तानपुरे ग्रामविकास अधिकारी संतोष नागोठकर सरपंच खेमा नपेलर ,उपसरपंच मुशरत उल्डे ,सदस्य गणेश नांगली ,परेश तांबो ,शालमीन हलडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

या आदिवासी कॅम्पमध्ये वाटप करण्यात आले ते नविन रेशनकार्ड १८, दुय्यम रेशनकार्ड ४, रेशनकार्ड मध्ये नाव कमी जास्त करणे ४, जातीचे दाखले १८, आधार कार्ड नोंदणी ९.


## उरण नगरपरिषद
जिल्हा रायगड

**Email-** municipalcounciluran@gmail.com urancouncil@rediffmail.com

जा.क्र.उपन/प्रशासन विभाग/ ६८४६/२०२४/२५ दिनांक : १४/०२/२०२५

**जाहीर सूचना**

**''महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५''**
**''अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत''**

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी काययातंर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकूण ६५ सेवाची यादी प्रसिद्ध केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिद्ध करून नगरप्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर केल्यास उरण नगरपरिषद कडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता उरण नगरपरिषद तर्फे पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी उरण नगरपरिषदेच्या नोटीस बोर्ड प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**


## रायगडात समृद्ध पाणथळ प्रदेश बहरतोय!

### अमूल्य ठेवा संवर्धित करून वाढविण्याची गरज

**पाली : प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या रांगा, पश्चिम घाट व तब्बल २४० किमीचा विस्तीर्ण समुद्र किनारा लाभलेल्या रायगड जिल्ह्यात जैवविधेतेने समृद्ध असे १३६ अधिकृत पाणथळ प्रदेश जिल्ह्यात आहेत. ही सर्व पाणथळ क्षेत्र २.२ हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रफळाची आहेत. मुंबई व पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या वेशीवर असलेल्या रायगड जिल्ह्यात नागरिकीकरण व औद्योगिकिकरण वाढत चाललेले असले तरी येथील पाणथळ प्रदेश अजूनही टिकून आहेत.

जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यावरण व निसर्ग अभ्यासक प्रवीण कवळे यांनी सांगितले की, पाणथळ क्षेत्रात जैवविविधतेचा बहुमूल्य ठेवा आहे आणि तो वाचवण्यासाठी व जपण्यासाठी पाणथळ ठिकाणांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. म्हणूनच पाणथळाच्या संवर्धनासाठी २ फेब्रुवारी हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर पाणथळ दिन म्हणून साजरा केला जातो.

रायगड जिल्ह्यातील एकूण अधिकृत पाणथळ क्षेत्र १५४७ हेक्टर आहे. यामध्ये सर्वाधिक ३६ पाणथळ क्षेत्र पनवेल तालुक्यात आहेत आणि त्यांचे एकूण क्षेत्र ९९६ हेक्टर इतके आहे. मागील काही वर्षांत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण व नागरीकरणामुळे तसेच फार्महाऊस संस्कृतीमुळे पाणथळ प्रदेश भराव टाकून बुजविले जात आहेत, तर काही ठिकाणी पाणथळचा नैसर्गिक पाणी प्रवाह अडविला गेल्याने पाणथळ प्रदेशच संपुष्टात येत आहे. सांडपाणी व कारखान्यातून सोडण्यात आलेली रसायनेही पाणथळ दूषित करत आहेत. या सर्व कारणांमुळे येथील पशुपक्षी, जलचर, वनस्पती आदींचा अधिवास नष्ट होत आहे. पर्यावरणास ही धोक्याची घंटा आहे. पाणथळ हा समृद्ध व अमूल्य ठेवा संवर्धित करण्याची गरज आहे.

पाणथळ प्रदेश म्हणजे काय : नदी, तलाव, सागरी किनारे अशा ठिकाणी उथळ पाण्याने झाकलेल्या व अनेकविध प्रकारच्या गवतांनी आणि झुडपांनी भरलेल्या पाणथळ जमिनी आपल्याला आढळतात. यामध्ये धरणे, कृत्रिम तलाव व कालवे, मिठागरे, सांडपाण्याचे तलाव, मत्स्यशेती तलाव, शेततळी, भाताची खाचरे अशा मानवनिर्मित स्थळांचाही समावेश होतो.

अशी झाली पाणथळ दिनाची सुरुवात : पाणथळ जागांचे संवर्धन आणि संरक्षण करण्याच्या उद्देशाने २ फेब्रुवारी १९७१ रोजी इराणमधील कॅस्पियन या समुद्राच्या किनाऱ्यावरील रामसर या शहरी पाणथळ प्रदेशाचे महत्त्व या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली होती. पाणथळ प्रदेशांना मानवी जीवनात असलेले स्थान सर्वांना समजावे या हेतूने दर वर्षी २ फेब्रुवारीचा दिवस 'वेटलँड्स डे' म्हणून साजरा केला जावा असा निर्णय या परिषदेत घेतला गेला. आणि १९९७ पासून २ फेब्रुवारी हा दिवस वेटलँड्स डे म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली. जगभरातील लोकांमध्ये पाणथळ जमिनीबाबत जनजागृती करण्यासाठी जागतिक पाणथळ दिन साजरा केला जातो. रामसर करार अंतर्गत सध्या साधारण १६८ देश एकत्र येवून २१७७ पाणथळ जागांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करीत आहेत.

पाणथळ प्रदेशाचे महत्त्व : जैविक विविधतेला जिवंत ठेवण्यात आणि ती वाढविण्यात पाणथळांची भूमिका अत्यंत मोलाची आहे. भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण करण्याचे काम असे प्रदेश करतात. प्रदूषित पाणी व इतर हानिकारक द्रव्ये अशा प्रदेशात फेकली जातात, परंतु पाणथळ जागी वाढणाऱ्या वनस्पती या घटकांना परिणामकारक करतात.

समुद्राचे आक्रमण थोपवतात : भातखाचरे आणि मत्सबीज उत्पादनासाठी बनवलेली तळीसुद्धा पाणथळ प्रदेशच असल्याने त्यांमधून जगभरातील तीन अब्ज लोकांना दररोजचे अन्न (भात आणि मासे) मिळते. सागरी किनारपट्टीवर असलेल्या अशा गवत युक्त पाणथळ प्रदेशांमुळे लाटांनी होणारी किनाऱ्यांची धूप थांबवली जाऊन वादळांपासून होणारे नुकसानही घटते. शिवाय समुद्राचे आक्रमण थोपवून किनारी जमीन अति क्षारयुक्त (निरुपयोगी खारपड) होण्याची क्रियाही तेथील मॅंग्रुव्ह (खारफुटी) प्रकारच्या झुडपांमुळे कमी होते. नदीला पूर आल्यास किंवा अतिवृष्टी झाल्यासही हे जास्तीचे पाणी किनारी पाणथळ प्रदेशात मुरते व मानवी वस्ती जलमय होण्याच्या संभाव्य धोक्याचे प्रमाण कमी होते. विविध पक्षी व प्राण्यांच्या निरीक्षणासाठी हे प्रदेश पर्यटन क्षेत्र म्हणून देखील विकसित होऊ शकतात.

विविध पक्ष्यांसाठी नंदनवन- बगळे, बदके, करकोचे, खंड्या तसेच शिकारी प्रजातींच्या व इतरही अनेक पक्ष्यांचा पाणथळ प्रदेश अधिवास आहेत. प्लवरसारख्या विशिष्ट प्रजातींची घरटी पाणथळ प्रदेशांत आढळतात. करकोचे, शराटी (इबिस), चमचा, रोहित (फ्लेमिंगो) हे पक्षीही पाणथळ जागीच येतात. अगदी सायबेरियासारख्या प्रदेशांतूनही क्रेन आणि बदके इथे येतात. कारण इथे त्यांना अन्न मिळते. हे पक्षी या प्रदेशातील अन्नसाखळीतील एक महत्त्वाचा दुवा असतात.

> ***वन विभाग मागील अनेक वर्षांपासून कांदळवने व इतरही पाणवठे जतन व संवर्धनाचे काम करत आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वैयक्तिक पातळीवर पाणथळ प्रदेश वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नुकत्याच आलेल्या अहवालानुसार जिल्ह्यात खारफुटी क्षेत्रात खूप वाढ झाली आहे. वनविभागा बरोबरच स्थानिकांच्या सहभागामुळे ही वाढ झाली आहे. ही बाब अतिशय सकारात्मक आहे. पाणथळ जागांचे/क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन होणे अत्यावश्यक आहे. कारण या ठिकाणी मोठ्या प्रमाणात स्थानिक, स्थलांतरित व परदेशी पक्षांचा अधिवास व वावर असतो.समीर शिंदे, वनक्षेत्रपाल,कांदळवने, अलिबाग***
>
> ***जैविक आणि पर्यावरणीय साखळीतील पाणथळ प्रदेशांचे महत्त्वाचे स्थान आहे. कडक नियम व कायदे करून पाणथळ प्रदेश जतन करून, तिथला कचरा व प्रदूषण दूर करून त्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. यासाठी प्रबोधन व जनजागृती देखील झाली पाहिजे.***
> ***-प्रवीण कवळे, निसर्ग व पर्यावरण अभ्यासक, अलिबाग***

## आकुर्ले शाळेत भरला आठवडे बाजार



**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या आकुर्ले प्राथमिक शाळेमध्ये आनंद बाजार महोत्सवाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सायरा पटेल यांनी केले होते. या वेळी बोलताना माजी केंद्र प्रमुख प्रतिभा साळोखे यांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना दहा रुपये कमविण्यासाठी किती मेहनत घ्यावी लागली हे प्रत्यक्षात अनुभवाला मिळाले, असे सांगितले.

या आनंद बाजार महोत्सवाचे उद्घघाटन केंद्र प्रमुख अनंत खैरे यांच्या हस्ते झाले. यावेळी पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ तसेच पाले भाज्यांचे स्टॉल लावले होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सायरा पटेल, बीड शाळेच्या मुख्याधापिका मंगल सोलनकर, मुख्याधापक सतिश कांबळे, नरेश म्हसे, अमित देशपांडे, धुंदा कांबडी, शिक्षिका स्वाती पाटील, लक्ष्मी पुरी, उपशिक्षिका अर्चना माने आदी उपस्थित होत्या.


## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### ई-निविदा सूचना

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.६७/६७/२०२५ दिनांक :- १४/०२/२०२५

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निमशासकीय** (Central Government / State Government / Government under taking) **विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार जाहीर ई-निविदा मागवीत आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/294/ 2024-25 | नवी मुंबई पोलिस आयुक्त, बेलापूर येथील कार्यालयाच्या भुखंडामध्ये डेटा सेंटर व कमांड कंट्रोल सेंटर उभारणे. | २,१३,९८,८६१/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर **दि. १५/०२/२०२५** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(कैलास गावडे)**
**अतिरिक्त आयुक्त- I**
**पनवेल महानगरपालिका**

## पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.६८/६८/२०२५ दिनांक :- १४/०२/२०२५

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | ई- निविदा किंमत रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुलभूत सोई सुविधांचा विकासाठी विशेष तरतूद योजना २०२४-२५ अंतर्गत व पनवेल महानगरपालिका निधीतून, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कोयनावेळे गाव ते एम.आय.डी.सी. (टेक्नोव्हा कंपनी) समोरील रस्ता डांबरीकरण करणे व गटर बांधकाम करणे. (पार्ट) | PMC/PWD /CE/ 03/2024-25 | १२,६५,९२,६५३/- ( GST वगळून) | ३,५४०/- | १५ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४/०२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

# स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोकरीची संधी मिळणे आनंददायी बाब -गणेश देशमुख

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका अर्थात स्थानिक स्वराज्य संस्थेत नोकरी करण्याची संधी मिळणे ही नक्कीच आनंद देणारी असते. त्यामुळे येथे काम करताना अत्यंत शिस्तबद्ध व संयमतेने काम करावे. असा मौलिक सल्ला महापालिकेचे माजी आयुक्त तथा सिडकोचे विद्यमान सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांनी दिला.




पनवेल महानगरपालिकेच्या नव्या जुन्या कर्मचाऱ्यांसाठी पायाभूत प्रशिक्षणाचे आयोजन आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये सुरू आहे. या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आयुक्त मंगेश चितळे हे होते.

मार्गदर्शन करताना देशमुख म्हणाले, पनवेल महानगरपालिकेत नोकरी मिळाल्यामुळे तुम्ही नशीबवान आहात. चारही बाजूने विकसित होत असलेली ही पनवेल महानगरपालिका आहे. येथे कामाची खूप मोठी संधी आहे. येथे चांगले काम करून उत्तम अधिकारी कर्मचारी होण्याचा प्रयत्न करावा.

सरकारी नोकरी करताना वर्तन कसे असावे? पेहराव कसा असला पाहिजे? तसेच उज्वल भविष्यासाठी गुंतवणूक कोठे करावी, याबाबतही देशमुख यांनी योग्य असे मार्गदर्शन केले.

पनवेल महानगरपालिकेची भरती अधिक परिपुण झाली आहे. येथील तत्कालीन वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रामाणिक मेहनतीमुळे ही भरती अधिक पारदर्शक होऊ शकली,असेही त्यांनी या वेळी सांगितले.

या वेळी बोलताना आयुक्त चितळे म्हणाले, पनवेल महानगरपालिकेला सुदृढ करण्याचे काम,महानगरपालिकेचा वित्तीय पाया मजबूत करण्याचे काम श्री. देशमुख यांनी केले आहे. त्यानुसार पुढील काळातही महापालिका आपला मार्गक्रमण करत आहे.

यावेळी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे उपसंचालक दिलीप मेणकर, उपायुक्त सर्वश्री कैलास गावडे, डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, सहायक संचालक नगररचना केशव शिंदे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे , लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त सर्वश्री स्वरूप खारगे, सुबोध ठाणेकर, श्रीराम पवार, स्मिता काळे, डॉ.रूपाली माने, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर ,महापालिकेचे सर्व विभाग प्रमुख, सर्व अधिकारी, सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त कैलास गावडे यांनी व सूत्रसंचलन सहायक आयुक्त स्वरूप खारगे यांनी केले, तर आभार उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी मानले. कर्मचाऱ्यासाठी सुरू असलेले हे पायाभूत प्रशिक्षण पुढे आणखी सुरू असणार आहे.

## बांगलादेशी नागरिक आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवा -वपोनि घाडगे

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत परदेशी तसेच बांग्लादेशी नागरिक बेकायदेशीर वास्तव्य करुन राहत असल्याचे निदर्शनास आल्यास सुजाण नागरिकांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे मध्ये तात्काळ समक्ष येऊन अथवा फोन द्वारे माहिती द्यावी, असे आवाहन 'पनवेल तालुका पोलीस ठाणे'चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे केले आहे.



पनवेल महापालिका हद्दीत विना परवानगी भरवल्या जाणार्या विविध आठवडे बाजारांमध्ये बांग्लादेशी नागरिक व्यवसाय करत असून, अवैध आठवडी बाजारांवर कारवाई करावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभा अधिवेशनात केली होती. दरम्यान, अनधिकृत बांग्लादेशी नागरिकांचा विषय अधिवेशनात उपस्थित झाल्यावर नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबईतील सर्वच पोलीस ठाणे प्रशासनांना बेकायदेशीर बांग्लादेशी नागरिकांना अटक करण्याचे आदेश दिले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशाची दखल घेत पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत परदेशी तसेच बांग्लादेशी नागरिक बेकायदेशीर वास्तव्य करुन राहत असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा सदर व्यक्ती विषयी संशय आल्यास जागृत नागरिकांनी तात्काळ पनवेल तालुका पोलीस ठाणे मध्ये समक्ष येऊन अथवा फोन द्वारे माहिती द्यावी, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी स्पष्ट केले आहे.

## मोहोपाडा येथे शस्त्रक्रिया शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील अष्टविनायक हॉस्पिटलच्यावतीने तज्ञ डॉक्टरांकडून शस्त्रक्रियाविषयी मोफत मार्गदर्शन करण्यात येणार असून सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे डॉ.अग्रवाल यांनी सांगितले.



यात मूळव्याध, फिस्टुला,फिश, हर्निया, पित्ताशयातील खडे, मूत्रपिंडातील खडे (मूत्राशयातील खडे, प्रोस्टेट ग्रंथी कर्करोग तसेच सर्व लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया जसे गर्भाशयातील गाठी, अंडाशयातील गाठ, गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया, वाकलेली नासाछिद्राची भिंत,कानाच्या पडद्याची शस्त्रक्रिया केस गळणे / टक्कल पडणे, सूजलेल्या शिरा (व्हेरिकोज व्हेन्स, मणक्याची डिस्क / पाठदुखी / कंबरदुखी या शिबीरात सहभागी रुग्णांना सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया, डॉक्टरांबरोबर सल्लामसलत (ओ पी डी), आणि इतर तपासण्यांवर करुन ५०% पर्यंत सवलत दिली जाणार आहे.

यासाठी नागरिकांनी आपली नावनोंदणी खालील क्रमांकावर मो. ०९४०४०४०३१९,मो-९८३३१०४४८७ पत्ता- आमंत्रण हॉटेलच्या बाजूला, दांडा आपटा रोड, मोहोपाडा (वासांबे)रसायनी येथे संपर्क करावा, असे आवाहन अष्टविनायक हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आली आहे.

## दिल्ली साहित्य संमेलनानिमित्त अभिजात मराठीचा ऑनलाईन जागर

### व्हिडीओ पाठवून सहभागी होण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

२१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने अभिजात मराठीचा 'ऑनलाइन जागर' हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात आपल्या कलागुणांचा व्हिडीओ शेअर करून देश-विदेशातील मराठी माणसांपर्यंत पोहचण्याची संधी मिळणार आहे.

या उपक्रमात कसे सहभागी व्हाल?

आपण स्वतः कवी, लेखक, कलाकार, गायक असाल तर आपल्या स्वरचित कवितेचा अथवा आपल्या कलाकृतीचा एक सुंदर व्हिडिओ तयार करून आम्हाला पाठवा. केवळ आपल्याच कविता नाही तर इतर मान्यवर कवींच्या कवितांचे सादरीकरणही (वाचन) आपण करू शकता. याबरोबरच गझल वाचन, गायन, लोककला सादरीकरण अशा अनेक स्वरूपात आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. अभिजात मराठीच्या या ऑनलाईन जागरामध्ये आपण अभंग, पोवाडे, नाट्यछटा, लघुकथा, गायन, भारुड आधी कलांच्या माध्यमातून सहभागी होऊ शकता. अभिजात मराठीच्या

- **ई-मेल आयडी**
  ई-मेल: ddikon12gmail.com आणि dgiprdlogmail.com या ई-मेलवर अथवा
- **व्हॉट्सअॅप क्रमांक**
  ८६९३०९०६६६, ९८९२६६०९३३ आणि ७५०४६९६७८६.

या उत्सवात आपला सहभाग हा आपल्या भाषेचा गौरव वाढविणारा ठरेल. तर चला मग करा रेकॉर्ड आपला व्हिडिओ आणि पाठवा आम्हाला.

आपले व्हिडिओ हे माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'महासंवाद' या पोर्टलवर आणि महासंचालनालयाच्या राज्यभरातील कार्यालयांच्या अधिकृत समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करण्यात येतील.

महाराष्ट्राला साहित्याची समृद्ध परंपरा लाभली आहे. ९८वे अखील भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठी भाषेच्या श्रीमंतीचा उत्सव साजरा करण्याची संधी आहे. आपल्या शब्दांनी आणि कलाकृतींनी ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अधिक संस्मरणीय बनवावे, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने करण्यात येत आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विभागीय माहिती कार्यालय कोकण भवन खालील समाजमाध्यमांवर उत्कृष्ट व्हिडीओ व कलाकृतीला प्रसिद्धी देण्यात येणार आहे.

## खंडणी मागणाऱ्यावर अखेर गुन्हा दाखल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

हॉटेल, बार चालकांना धमकावून खंडणी उकळणाऱ्या तोतया पत्रकारविरोधात एपीएमसी व नेरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवी मुंबईत बार, हॉटेल, मसाज पार्लर अशा आस्थापना चालकांकडून होत असलेल्या नियमांच्या उल्लंघनाचा फायदा तोतये पत्रकार, कथित सामाजिक कार्यकर्ते घेत आहेत. त्यापैकी अनेकांना वर्दीतल्याच बाबूंचे पाठबळ असून तक्रारीसाठी त्यांचा वापर होत आहे. त्यामुळे मुंब्रा, मानखुर्द परिसरातील टोळ्या नवी मुंबईत वसुलीचे रॅकेट चालवत आहेत. अशाच प्रकारातून देवेश मिश्रा याच्यावर एपीएमसी व नेरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तक्रार न करण्यासाठी यापूर्वीही पैसे उकळल्याचा आरोप आहे. रबाळे पोलिस ठाण्यात अनधिकृत बांधकाम प्रकरणात खंडणी स्वरूपात फ्लॅट मागणाऱ्या टोळीवर गुन्हा दाखल झाला आहे.

## पीएमश्री शाळेत मोफत आरोग्य शिबिर

**उरण : प्रतिनिधी**

जिल्हा क्षयरोग कार्यालय अलिबाग रायगड, तालुका आरोग्य अधिकारी उरण आणि ओएनजीसी कंपनी उरण प्लांट यांच्या संयुक्त विद्यमाने काल दिनांक १२ फेब्रुवारी रोजी पी.एम. श्री रा.जि.प.शाळा मुळेखंड या शाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिर व क्षयरोग जनजागृती कार्यक्रम झाला.



अंगणवाडी ते शाळेतील इयत्ता सातवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत दंतचिकित्सा, नेत्रचिकित्सा, आरोग्य तपासणी तसेच क्षयरोग जनजागृती कार्यक्रम झाला.

या शिबिरासाठी जिल्हा क्षयरोग आरोग्य अधिकारी डॉक्टर दात्रांव, तालुका आरोग्य अधिकारी कक्ष श्री. जाधव तसेच ओएनजीसी प्लांट मॅनेजर बिक्रम सिंग, हेड फायनान्स मेहता, हेड एचआर भावना आठवले, मेडिकल ऑफिसर इनचार्ज डॉक्टर जीवन वाघमारे, डॉक्टर रवींद्र त्रिपाठी, डॉक्टर रितू खेमानी, डॉक्टर ऋत्विक कुलकर्णी, डॉक्टर रेवती, नेत्र चिकित्सक डॉक्टर पी.एम गर्ग, डॉक्टर मेरी जान, आरोग्य सेविका मोनाली पाटणकर, मारिया, श्री.प्रकाश, सादीक खान, गौरव, अभिषेक इतर या टीमने सर्व विद्यार्थ्यांची यशस्वीपणे तपासणी करून शेवटी ओएनजीसीच्या मार्फत पूरक आहार व आरोग्य किट तसेच आरोग्य विषयक मार्गदर्शन देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर यांनी सर्व उपस्थितांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सन्माननीय अध्यक्षा मनीषा म्हात्रे व सर्व सदस्य तसेच चार अंगणवाडी सेविका सर्व शिक्षकवृंद विद्या वाणी, दिशा तांडेल, संजय होळकर, सौ अर्चना पाटील, सौ सुजाता होळकर, मिलिंद म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेऊन हे शिबिर यशस्वी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शाळेचे उपक्रमशिल शिक्षक संजय होळकर यांनी मानले.

## ऐरोलीमध्ये दोन राउंड फायर; पोलिसांकडून तपास

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ऐरोली सेक्टर १ मध्ये फायरिंग झाल्याची घटना घडली आहे. ऐरोलीतील सेक्टर १ मधील शिव कॉलनी जवळ ही घटना घडली आहे. सदर घटनेत अद्याप कोणीही जखमी झालेलं नाही. मात्र पैशाच्या वादातून फायरिंग केल्याच बोलले जात आहे. घाबरवण्यासाठी विकासाधीन असलेल्या इमारतीच्या भिंतीवर दोन राउंड फायर केल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. सदर घटनेत रबाळे पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून नेमकं फायरिंग कोणी कोणावर केली याचा पोलीस तपास घेत आहेत. यामध्ये रबाळे पोलिसांनी एका संशयीत इसमाला ताब्यात घेतले असून रबाळे पोलिस पुढील तपास करत आहेत. मात्र विकासाधीन इमारतीवर फायरिंग झाल्याने विकासकाकडील पैश्याच्या देवाणघेवाणीवरुन सदर ची फायरिंग केली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## खासगी प्राथमिक शाळा संघटना वर्धापन दिन सोहळा



**कळंबोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळां मधील शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची संघटना कार्यरत आहे. या संघटनेचा वर्धापन दिन शुक्रवारी पनवेल तालुक्यात मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रम संघटनेच्या सदस्यांनी आयोजित केले होते .त्यामध्ये सर्वच शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन संघटनेचा वर्धापन दिन सोहळा उत्साह पूर्ण वातावरणात साजरा केला.

कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालय,न्यू इंग्लिश स्कूल, नवीन पनवेल येथील श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालय व पनवेल मधील के.वी कन्या विद्यालय, तसेच खारघर कामोठा , तळोजा येथील प्राथमिक विद्यालयातून शिक्षक संघटना वर्धापन दिन मोठ्या उत्साह पूर्ण वातावरण साजरा करण्यात आला .यावेळी शिक्षकांना पेन, पुस्तक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले .तसेच संघटनेच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करून पर्यावरणाचा समतोल राखण्यास सहकार्य करण्यात आले.

या वेळी संघटनेचे उपाध्यक्ष सुधाकर जैवळ, सचिव यशवंत मोकल, जिल्हा कार्यकारणी सदस्य मेघा मोरे, ज्ञानेश्वर ठाकूर, दशरथ म्हात्रे तसेच मुख्याध्यापिका वनिता कोळी, वैशाली पाटील, सुजाता भोसले, अनंता ठाकूर तसेच मोठ्या संख्येने शिक्षक शिक्षकेतरवर्ग या वर्धापन सोहळ्यात सहभागी झाले. विद्यालयातील निवृत्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्गानेही सोहळ्यात सहभाग नोंदवला.

दरम्यान, प्रत्येक शाळेत संघटनेच्या सदस्यांनी विविध उपक्रम राबवून संघटनेचा चौथा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला.

### क्लिक...क्लिक...!



**पनवेल : शहरातील मुख्य भाजी मार्केट परिसरामध्ये रस्त्यालगत भाजी, फुले, कडधान्य, कांदे-बटाटे आदींची विक्री करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांसाठी महापालिकेने जागा उपलब्ध करून दिली आहे. त्या ठिकाणी ते आपला व्यवसाय करीत असतात.** (छाया : तन्वी पवार)

## वीर वाजेकर महाविद्यालयात कृत्रिम फुलनिर्मिती कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे (उरण) येथे झूलॉजी विभागाच्या वतीने तसेच इनोव्हेशन आणि इनक्युबेशन सेल व करिअर गाईडन्स आणि प्लेसमेंट सेल कमिटीच्या सहकार्याने Artificial Flower and Bouquet Making या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



या कार्यशाळेत प्रमुख प्रशिक्षक म्हणून सानिया घरत आणि हर्षिता घरत या महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले विद्यार्थ्यांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग घेऊन स्वतः गुच्छ आणि फुलं बनविली.

कार्यक्रमाचे नियोजन डॉ. जी.सी. वधवा इनोव्हेशन आणि इनक्युबेशन सेल, प्रमुख, आणि प्रा. पंकज भोये करिअर गाईडन्स आणि प्लेसमेंट सेल कमिटी अध्यक्ष यांनी केले .

महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. त्यांनी विद्यार्थ्यांना कौशल्यवर्धक कार्यशाळांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी कौशल्यात प्रावीण्य मिळवले पाहिजे ज्याचा वापर छंद म्हणून जोपासना करावी व गरज भासल्यास उपजीविकेचे साधन व्हावे.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना हस्तकलेचे ज्ञान मिळाले तसेच स्वावलंबन आणि उद्योजकतेच्या दृष्टीने नवी दिशा मिळण्यास मदत झाली. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ झेलम झेंडे, डॉ श्रेया पाटील, डॉ आर बी पाटील यांची मोलाची साथ लाभली.

## दिघ्यात अनधिकृत बांधकामावर हातोडा

**नवी मुंबई: : प्रतिनिधी**

दिघा येथे उभारण्यात येत असलेल्या अनधिकृत बांधकामावर सिडकोच्या संबंधित विभागाने मंगळवारी कारवाई केली. दिघा येथील ईश्वरनगरमध्ये लक्ष्मीप्रसाद यादव याने सक्षम प्राधिकरणाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीररित्या दुकानाचे बांधकाम सुरू केले होते. सिडकोच्या गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. बांधकाम टाळण्यासाठी कारवाया करण्यात येत आहेत. अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने गुप्ता याला नोटीस बजावून बांधकाम थांबविण्याचे निर्देश दिले होते. मात्र, त्यानंतरही बांधकाम सुरूच ठेवल्याने त्यावर कारवाईचा उगारण्यात आला.

# माथेरान वाहनतळात 'सीसीटीव्ही' आवश्यक




**माथेरान : बातमीदार**

माथेरान पर्यटनस्थळी असलेल्या वाहनतळात काही समाजकंटकांकडून वाहनांचे नुकसान केले जात आहे. वाहनतळामध्ये उभ्या असलेल्या वाहनांची हवा काढणे, वाहनांवर धारदार वस्तूने रेघोट्या ओढणे, आरसे काढणे अशा प्रकारे वाहनांचे नुकसान काही लोकांकडून येथे जाणीवपूर्वक केले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

येथील वाहनतळातील बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे व्यवस्थितपणे सुरू करावे आणि या कमेरांचे लाईव्ह लोकेशन सर्वांसाठी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी स्थानिकांकडून वनविभागाकडे केली जात आहे.

माथेरान पर्यटनस्थळी असलेल्या वाहनतळात येथील स्थानिक नागरिकांबरोबर येणाऱ्या पर्यटकांची वाहने उभी केली जातात. वनविभागामार्फत वाहन कर येथे आकारला जातो. स्थानिक नागरिक आणि पर्यटक यांच्या महागडी वाहने या ठिकाणी उभी असतात, मात्र अनेकदा वाहनतळात उभ्या असलेल्या वाहनांचे मोठे नुकसान झाल्याच्या घटना येथे घडल्या आहेत. १३ फेब्रुवारी रोजीसुद्धा माथेरानमधील निवृत्त शिक्षक सुनील शिंदे यांच्या वाहनांच्या एका बाजूच्या दोन्ही चाकातील हवा काढून वाहन पंचर करण्यात आले. याबाबत शिंदे हे येथील वनविभागाकडे चौकशी आणि सीसीटीव्ही पाहण्यासाठी गेले असता सीसीटीव्ही बंद असल्याचे निदर्शनास आले त्यामुळे ही घटना कोणी व का केली हे समजू शकले नाही. अशा प्रकारच्या अनेक घटना माथेरान वाहनतळात वारंवार घडल्या असल्याचेपण समाजमाध्यमांवर बोलले जात आहे.

माथेरान पर्यटनस्थळी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांवरदेखील असेच प्रकार मागील काळात झालेले आहेत. माथेरान येथील वाहनतळात असे काही चुकीचे प्रकार घडले की काही दिवस समाजमाध्यमांवर याची चर्चा सुरू असते आणि माथेरान नगरपालिका आणि माथेरान वनविभाग यांची एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याचे काम सुरू असते.

कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नसल्याचेदेखील नागरिकांमधून बोलले जात आहे. येथील संपूर्ण वाहनतळात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी आता नागरिकांमधून केली जात आहे. त्याचबरोबर या तिसऱ्या डोळ्यांचे लाईव्ह लोकेशन सर्वांसाठी उपलब्ध व्हावे, अशी मागणीसुद्धा काही स्थानिक नागरिकांकडून या ठिकाणी केली जात आहे. येथील काही विकृत बुद्धीच्या लोकांकडून असे प्रकार पुन्हा माथेरान वाहनतळात घडू नये याकरिता वाहनतळातील सर्व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

माथेरान वाहनतळ झोनमध्ये संपूर्ण परिसरात एकूण ३२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव येथे मंजूर करण्यात आला आहे. सीसीटीव्ही कॅमेरे लवकरच येथे कार्यान्वित केले जातील तसेच यांची देखभाल दुरुस्तीसुद्धा वनविभागमार्फत केली जाईल, असे माथेरान वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश जाधव यांनी या संदर्भात बोलताना म्हटले आहे.

# बारशिव गावात हाय व्होल्टेजमुळे विजेच्या उपकरणांचे मोठे नुकसान

## महावितरणने नुकसानभरपाई देण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील भोईघर ग्रामपंचायत हद्दीमधील बारशिव गावासाठी असणाऱ्या ट्रान्सफॉर्मरमध्ये ११ फेब्रुवारी रोजी दुपारी स्फोट होऊन हाय व्होल्टेजमुळे अनेक घरातील टीव्ही, फ्रीज, मिक्सर, एसी, इन्व्हटरर्स अशा घरगुती तसेच जीवनावश्यक वस्तू जळून जाऊन निकामी झाल्या आहेत. या गावातील सुमारे २८ लोकांच्या घरातील मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

भोईघर ग्रामपंचायत सरपंच हर्षद महाडिक, उपसरपंच प्रसाद चौलकर, सामाजिक कार्यकर्ते अमित गोपाळे यांनी मुरूड महावितरणचे उपमुख्य कार्यकारी अभियंता सूर्यवंशी तसेच तहसीलदार रोहन शिंदे यांना निवेदन देऊन महावितरणने नुकसान झालेल्या घरातील व्यक्तींना योग्य ती भरपाई द्यावी; अन्यथा दुर्लक्ष केल्यास जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा या वेळी त्यांनी दिला.



बारशिव गावात ५६० लोकांची वस्ती असून येथील बहुसंख्य लोक वीज ग्राहक आहेत. ११ फेब्रुवारी रोजी अचानकपणे बारशिव येथील वीजपुरवठा हाय व्होल्टेज झाल्याने ट्रान्सफॉर्मरमध्ये स्फोट होऊन गावातील घरगुती वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. महावितरणने झालेल्या या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करावी व पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामपंचायत, ग्रामस्थ यांच्याकडून करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती सांगताना भोईघर सरपंच हर्षद महाडिक, उपसरपंच प्रसाद चौलकर, सामाजिक कार्यकर्ते अमित गोपाळे यांनी सांगितले की, आम्ही रीतसर अर्ज देऊन महावितरणने पाहणी करून व पंचनामे करून ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना त्वरित भरपाई द्यावी ही मागणी केली आहे. या घटनेमध्ये वीज वापरणाऱ्या ग्राहकांचा कोणताही दोष नाही. योग्य निगा न राखल्यामुळे असे प्रकार बारशिव गावात तीन महिन्यानंतर घडत आहेत याची जबाबदारी महावितरणची आहे.

# काटेतळी येथील खातेदाराचा प्रामाणिकपणा

## अतिरिक्त आलेले एक लाख रुपये बँकेला केले परत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर येथील एसडीएफसी बँकेत गुरुवारी दुपारी एका खातेदाराने दिलेल्या चेकवर एक लाखाची रक्कम लिहिली असताना कॅशियरने चक्क दोन लाख रुपये दिले. यानंतर रक्कम घेऊन बॅगमध्ये ठेवणाऱ्या खातेदाराला एक लाख रुपये रक्कम जास्त असल्याचे दिसून आल्याने त्याने प्रामाणिकपणे रक्कम परत केली.



एसडीएफसीच्या पोलादपूर शहरातील बँक शाखेत कॅशियर रजेवर असल्याने मोर्बा येथील शाखेतील कॅशियर महिला या कामासाठी रूजू झाली आहे. गुरुवारी दुपारी काटेतळी येथील विजय गोविंद मोरे यांनी एक लाखाचा चेक लिहून कॅशियरकडे दिला आणि कॅशियरने दिलेली रक्कम बँकेमध्ये ठेवून ते त्यांच्या कामानिमित्त बाहेर गेले. त्यांनी काही वेळाने रक्कम मोजली असता एक लाखाऐवजी दोन लाख रूपये बॅगेत असल्याचे दिसून आले. यामुळे त्यांनी त्यांचे स्नेही ॲड.मंगेश मोहिरे वकिलांना ही बाब सांगितली. कोणतीही कायदेशीर अडचण निर्माण होऊ नये म्हणून मोरे यांनी चर्चा केली आणि सायंकाळी बँक बंद होण्यापूर्वी एसडीएफसी बँकेत जाऊन एक लाखाची जादाची रक्कम कॅशियरकडे जमा केली.

पोलादपूर एसडीएफसी बँकेचे मॅनेजर निलेश आंबेतकर यांनी बँकेच्या सेवेप्रमाणे आमचे ग्राहक व खातेदारदेखील प्रामाणिक असल्याचे या घटनेतून सिध्द झाले असून आम्ही ग्राहक विजय मोरे यांच्या प्रती आदर व्यक्त करीत असल्याचे सांगितले.

# खालापुरात १७ अंगणवाडी सेविकांसह ४० मदतनीसांची भरती

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील रिक्त असलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची पदे भरण्यात येत असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

खालापूर तालुक्यात नवीन व जुन्या अंगणवाडी येथील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची पदे रिक्त होती, काही महिन्यांपूर्वी संपुर्ण राज्य भर ही पदे भरण्याचे शासन निर्णय झाला होता, परंतु काही कारणास्तव ही भरती शासनाने स्थगित केली होती.आता नव्याने महिला व बाल विकास विभाग शा.नी.क्र. एबावी/२०१७प्र.क्र.९४ का.६/३० जानेवारी २०२५ व मा.आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी भरतीचे आदेश दिले आहेत.

यानुसार देवन्हावे, जांभिवली, आनंदवाडी (वावंढळ) नावंडे, जांभीवली, खरसुंडी कातकरवाडी, माजगाव, खरीवली, होराळे, कारगाव, मुळ वडवळ, कलोते फोंडावाडी, आसरे, भिलवले, इसांबे आदिवासीवाडी, बोरीवली, दांडवाडी (वावोशी) ही १७ पदे सेविका यांची असून जांबरूग ठाकूरवाडी, चावणी, गोरठण खुर्द, नारंगी दत्तवाडी, धवली, आनंदवाडी (वावंढळ) बापदेववाडी (विनेगाव) पीरकटवाडी (वरोसे) चांगेवाडी (सोंडेवाडी) इरसालवाडी (चौक) खैराट(वावरले) पौद, वारद,वाशिवली कातकरवाडी,खरसुंडी कातकरवाडी, वडगाव, पराडे, टेम्भरी कातकरवाडी, वावोशी दांडवाडी, टेंभेवाडी (होनाड) तांबाटीवाडी, नारंगी आदिवासीवाडी, अजिवली, मुळगाव वडवळ, कलोते बौध्दवाडी, आंबेवाडी, अंबरनेवाडी, आसरेवाडी, काटवण (सोंडेवाडी) भिलवले, माडप खेरवाडी, वडगांव डोंगरवाडी, वाशिवली ठाकूरवाडी, इसांबे आदिवासीवाडी, नढाळ ठाकूरवाडी, तळवली दांडवाडी, दांडवाडी वावोशी,वावोशी बौद्धवाडा, धनगरवाडा येथे मदतनीस यांची भरती करण्यात येणार आहे.

अर्ज ऑफलाईनद्वारे २१ फेब्रुवारीपर्यंत कार्यालयात स्वीकारण्यात येणार आहेत. वय वर्ष १८ ते ३५ असून विधवा महिलांना ४० वर्ष लागू आहेत.वरील भरती ग्रामीण भागातील असून तिची व्यापक प्रसिद्धी होणे गरजेचे आहे. अनेक ठिकाणी याची माहिती नसल्याने अर्ज भरण्यास विलंब होण्याची शक्यता असून अंगणवाडी सुपरवायझर यांनी दक्षता घ्यावी असे आवाहनही करण्यात आले आहे.

# श्री मानकरीदेव वर्धापन दिन सोहळा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दिवेआगरमधील श्री मानकरीदेव (गांबदेव) यांचा वर्धापन दिन १९ फेब्रुवारी रोजी भव्य महाप्रसाद आणि पालखी मिरवणुकीसह साजरा केला जाणार आहे. या वेळी दिवेआगर व पंचक्रोशातील भाविक आणि समाज बांधवांनी या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

श्री मानकरीदेव यांच्या वर्धापन दिनानिमित्त होणारा हा उत्सव संपूर्ण दिवेआगर आणि परिसरातील भाविकांसाठी एक अत्यंत विशेष धार्मिक कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री मानकरीदेवाच्या आशीर्वादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अखंड कोळी समाज, दिवेआगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कृणाल चौधरी पखवाज विशारद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वदप गावामध्ये राहणारा कृणाल महेश चौधरी पखवाज वादनाच्या आतापर्यंत एकूण सात परीक्षा देऊन विशारद बनला आहे. कृणालने नुकतीच पखवाजमधील सातवी विशारद परीक्षा उत्तीर्ण झाला.



कृणालने वयाच्या पाचव्या वर्षापासून मंगेश बेडेकर यांच्याकडे पखवाज वादनाचे शास्त्रोक्त शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्याने वाद्य वादन करायला सुरुवात करून लहानपणीच भजनी गायकांना साथ करायला सुरुवात केली. वयाच्या सातव्या वर्षी त्याने श्री कोकण आगर महोत्सव कर्जत २०१३मध्ये वाद्यवादन स्पर्धेत पखवाज सोलो वादनात प्रथम क्रमांक मिळविला तसेच २०१४मध्ये मृदंग व ढोलकी वादनात प्रथम क्रमांक मिळविला

अनेक वादन व भजन स्पर्धेत यश मिळवता मिळवता कृणाल याने वयाच्या दहाव्या वर्षापासूनच अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई यांच्या पखवाज वादनाच्या परीक्षा देण्यास सुरुवात केली होती. आतापर्यंत एकूण सात परीक्षा देऊन कृणालने सातवी विशारद पूर्ण करून पदवी मिळवली आहे.

# माणगाव येथे पाककला स्पर्धा उत्साहात



**माणगाव : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत माणगाव नगरपंचायत हद्दीतील विकास कॉलनी शाळेत स्मार्ट मातांसाठी उतेखोल केंद्रस्तरीय पाककला स्पर्धा उत्साहात झाली.

या स्पर्धेचे उदघाटन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अक्षय जाधव, राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार, माणगाव नगरपंचायतीच्या महिला व बालकल्याण समिती सभापती नंदिनी बामगुडे यांच्या हस्ते तसेच केंद्र प्रमुख शंकर शिंदे, चारिझेन फाउंडेशनचे अध्यक्ष निर्मलसिंग रंधावा, उपाध्यक्ष सतीश काळे, फाउंडेशनचे मार्केटिंग व्यवस्थापक राकेश पडवळ, सदस्य किशोर झेमसे, केंद्रातील शाळांचे मुख्याध्यापक आदींच्या उपस्थितीत झाले. आले.

उपस्थितांचे स्वागतग शाळेच्या मुख्याध्यापिका अपूर्वा येलवे, शिक्षिका सुधा साळवी, निलम गायकवाड, नंदिनी वाले, वनिता डोळस, सायली अंबुर्ले यांनी केले.

मुलांना लहान वयापासूनच पौष्टिक आहार मिळावा याकरिता तृण धान्याचे महत्त्व सर्वाना समजावे हा पाककला स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. या वेळी सर्व मान्यवरांनी पाककला स्पर्धेची पाहणी करून पदार्थांचा आस्वाद घेतला.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून आहार तज्ञ डॉ. प्राजक्ता उभारे, अपर्णा काटकर, नम्रता जाधव यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन शाळेच्या मुख्याध्यापिका येलवे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार केंद्र प्रमुख शंकर शिंदे यांनी मानले.

# महेश निमणे पुरस्काराने सन्मानित

**खोपोली** : वास्तुशास्त्र व्यवसायातील महेश निमणे यांना बुज हास्य क्लबच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत पुरस्कार देऊन उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास कोमसापचे सभासद उपस्थित होते. क्लबचे संस्थापक बाबुभाई ओसवाल, सावित्री जाधव, विजय घोसाळकर, संतोष वाघ, हेमंत नांदे, रोहिदास गुरव, गणेशकर व इतरांनी कार्यक्रम यशस्वी केला. सूत्रसंचालन शोभा धायगुडे यांनी केले.



# शासकीय प्रयोजनात मराठी

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ व २३ फेब्रुवारी या तीन दिवसांत संपन्न होत आहे. हे ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. संमेलन यशस्वी करण्यासाठी अनेक हात मदत करत आहे. शासनही याला पाठबळ देत आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

प्रशासकीय कामकाज मराठीतून करणे आवश्यक आहे, हे आपल्याला माहीत आहे. पण याची सुरुवात नक्की कधीपासून झाली, कोणत्या नियमान्वये झाली याची माहिती आपल्यापैकी बऱ्याच जणांना नसेल हे सर्व मराठीजनांना माहिती होणे आवश्यक आहे.

मराठी भाषेचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टिकोनातून २०१०मध्ये स्वतंत्र मराठी भाषा विभाग स्थापन करण्यात आला. प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्यासाठी सर्वांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, मराठी भाषा वृद्धिंगत होण्यासाठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी प्रयत्न करणे आदी विभागाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विभागामार्फत विविध योजना, उपक्रम राबवण्यात येतात. या उपक्रमांचाच एक भाग म्हणून मराठीचे वैभव जपण्यासाठी, मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. भाषा पंधरवड्यानिमित्त महाराष्ट्रातील सर्व शासकीय/केंद्रशासकीय कार्यालये, बँका, शैक्षणिक संस्था यांच्यामार्फत मराठी भाषेत विविध स्पर्धा, कार्यक्रम आयोजिण्यात येतात. अमराठी कर्मचाऱ्यांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यात येते.

### धोरण जाहीर

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आल्यानंतर राज्य शासनाने शक्य तितक्या लवकर इंग्रजीऐवजी मराठीतून राज्य कारभार करण्याचे धोरण जाहीर केले. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४अन्वये २६ जानेवारी १९६५पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली व महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगीकार करण्यात आला. राज्य सरकार वेळोवेळी निर्दिष्ट करील अशी वर्जित प्रयोजने वगळता उर्वरित सर्व शासकीय प्रयोजनांकरिता महाराष्ट्र राज्याच्या संबंधात उपयोगात आणावयाची भाषा मराठी असेल अशी तरतूद या अधिनियमाद्वारे करण्यात आली.

राजभाषा अधिनियमान्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून ३०.०४.१९६६ या अधिसूचनेन्वये काही वर्जित प्रयोजने निर्दिष्ट करण्यात आली. १ मे १९६६पासून वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय प्रयोजने मराठीतून करणे अनिवार्य करण्यात आले. वर्जित प्रयोजने म्हणजे अशी शासकीय कामकाजाची प्रयोजने ज्यामध्ये मराठी भाषेचा वापर करण्याची सक्ती नाही. त्यामध्ये साधारणपणे केंद्र शासन व केंद्रीय कार्यालये, अन्य राज्ये, परराष्ट्रांचे दूतावास, महालेखापाल यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार तसेच, वैद्यकीय औषधी योजना व अहवाल आणि वैद्यकीय विभागातील तांत्रिक बाबी इत्यादींचा समावेश आहे.

अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

### विविध उपाययोजना

शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे सुलभ व्हावे म्हणून शासनाने बऱ्याच उपाययोजना केल्या. शासकीय कर्मचाऱ्यांना मराठीतून टिपण्या व पत्रव्यवहार करणे सुलभ व्हावे या उद्देशाने प्रशासनिक लेखनाला उपयुक्त होईल असे साहित्य, पुस्तके. शुद्धलेखन नियमावली, विविध परिभाषा कोश, शब्दावल्या तयार करण्यात आल्या व त्यांच्या प्रती शासकीय कार्यालयांना पुरवण्यात आल्या. सध्या या सवचि भ्रमणध्वनी उपयोजकदेखील उपलब्ध आहे. इंग्रजी टंकलेखकांना व लघुलेखकांना मराठी टंकलेखनाचे व लघुलेखनाचे प्रशिक्षण देण्यात आले. अमराठी भाषिक अधिकाऱ्यांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी मराठीचे प्रशिक्षण वर्ग चालवण्यात आले. एतदर्थ मंडळामार्फत मराठी भाषा परीक्षा घेण्यात येऊ लागल्या. मराठी भाषेचा वापर शासकीय प्रयोजनांत सर्व विभागांनी व प्रशासकीय कार्यालयांनी करावा, यासाठी मराठी भाषा विभागामार्फत वेळोवेळी परिपत्रके, शासन निर्णये इत्यादींद्वारे सूचना देण्यात आल्या. या सर्व सूचना ७ मे २०१८च्या परिपत्रकामध्ये एकत्रितरीत्या पुन्हा सर्व कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

वर नमूद केलेले सर्व प्रयत्न करूनही मराठी भाषेच्या वापराबाबत शासनाने ठरवलेले उद्दिष्ट साध्य होत नसल्याने महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४मध्ये काही महत्त्वाच्या सुधारणा महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१नुसार करण्यात आल्या. यामध्ये नक्की कोणकोणत्या शासकीय प्रयोजनांमध्ये मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, ती शासकीय प्रयोजने स्पष्ट करण्यात आलेली आहेत. वर्जित प्रयोजने वगळता उर्वरित शासकीय प्रयोजनात मराठी भाषेचा वापर होतो आहे ना हे पाहण्यासाठी प्रत्येक कार्यालयात मराठी भाषा अधिकारी नेमण्याची तरतूद आहे.

### मराठी व्यवहारात

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४मधील तरतुदी फक्त प्रशासकीय कामकाजापुरत्याच मर्यादित आहेत, मात्र दैनंदिन व्यवहारात लागणाऱ्या अनेक गोष्टी मराठी भाषेत उपलब्ध असाव्यात, अशी अपेक्षा सर्वसामान्य लोकांची असते. त्यानुसार तक्रारी मराठी भाषा विभागाकडे प्राप्त होतात. त्या वेगवेगळ्या विभागांशी संबंधित असतात. उदाहरणार्थ रस्ते, उद्याने, दुकाने, गृहनिर्माण संस्था, शैक्षणिक संस्था यांच्या पाट्या, वस्तूंची वेष्टणे व त्यावर लिहिलेली माहिती, नगरपालिकांमार्फत प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या जाहिराती इ. माहिती त्यांना मराठी भाषेत हवी असते. संबंधित विभागांनी ती माहिती मराठी भाषेत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यासंबंधी त्यांच्या धोरणामध्ये मराठीचा वापर करण्यासाठी यथोचित तरतूद करेल आणि सर्व कार्यालये त्यांच्या संकेतस्थळावर किंवा संदेशवहनाच्या कोणत्याही साधनावर मराठी भाषेच्या वापराबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण करतील, अशी तरतूद अधिनियमात करण्यात आली आहे.

मराठी भाषेचा वापर न केल्याबाबत येणाऱ्या तक्रारींची जिल्हापातळीवरच दखल घेऊन लगेच कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा समिती स्थापन करण्यात येणार आहे. सदर समिती जिल्ह्यामध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करेल आणि मराठी भाषेबाबतचे उपक्रम आपापल्या जिल्ह्यात राबवेल. जिल्हास्तरीय समितीला मदत करण्यासाठी तसेच सल्ला देण्यासाठी राज्यस्तरावरदेखील एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद अधिनियमात करण्यात आलेली आहे. प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर वाढवण्यासाठी अनेक उपाययोजना विभागाकडून निरंतर सुरू आहेत. अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणीसाठी इतर विभागांचा व प्रशासकीय कार्यालयांचा सहभागदेखील मोलाचा आहे.

**–रायगड जिल्हा माहिती कार्यालय, अलिबाग**

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्राच्या पदकांचे द्विशतक

**हल्दवानी : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राने सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत दोनशे पदके जिंकण्याचा पराक्रम केला आहे. ३८व्या स्पधेतही द्विशतकी कामगिरी करणारे महाराष्ट्र देशातील एकमेव राज्य ठरले आहे. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी मल्लखांबपटू यशाने महाराष्ट्राने २०१ पदके जिंकून स्पर्धा गाजवली.



उत्तराखंडातील ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ५४ सुवर्णांसह ७१ रौप्य, ७६ कांस्यपदकांची लयलूट करीत पदकतक्यात महाराष्ट्र दुसरे स्थान प्राप्त केले आहे. गत गोवा स्पर्धेत महाराष्ट्राने ८० सुवर्ण, ६७ रौप्य व ७९ कांस्य अशी एकूण २२८ पदकांची लयलूट करीत ऐतिहासिक कामगिरी केली होती. यंदाही २०० पदकांचा पल्ला महाराष्ट्राने पूर्ण करण्याचा इतिहास घडविला आहे.

स्पर्धेच्या १७व्या दिवशी रात्री ऊशिरापर्यंत मल्लखांब स्पर्धेचा निकाल जाहिर करण्यात आला नव्हते. स्पर्धा समितीने शुक्रवारी सकाळी पदकाचा अंतिम तक्ता जाहिर केला. यामध्ये मल्लखांबमधील तीन कांस्यपदकांमुळे महाराष्ट्राने पदकाचे द्विशतक पूर्ण केले. शार्दूल हृषिकेश, रिषभ घुबडे व दर्शन मिनियार यांनी महाराष्ट्रासाठी शेवटची पदके जिंकली. त्यापूर्वी अखेरचे सुवर्णपदकही रूपाली गंगावणे हिने पटकावले. मल्लखांबात शार्दूल हृषिकेशने पदकांचा चौकार झळकविला. आदित्य पाटील, सोहेल शेख मृगांक पाठारे यांनही पदकांची कमाई केली आहे. चार सुवर्ण, चार रौप्य व पाच कांस्यपदकांची लयलूट मल्लखांबात महाराष्ट्राने करून विजेतपदही प्राप्त केले.

तब्बल २७ क्रीडा प्रकारात महाराष्ट्राने पदके जिंकण्याचा कामगिरी केली आहे. जिम्नॉस्टिक्स सर्वाधिक १२ सुवर्णांसह २४ पदके महाराष्ट्राने जिंकली आहेत. महाराष्ट्राने कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दन राज्याचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार, क्रीडामंत्री दत्ता भरणे, महासचिव नामदेव शिरगावकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.



# पत्रकारांच्या क्रिकेट स्पर्धेत गोरेगाव संघ विजेता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई संलग्न पेण पत्रकार संघाच्या वतीने रायगड जिल्ह्याच्या सर्व पत्रकार बांधवांसाठी पेण नगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर एकदिवसीय भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रोहा व गोरेगाव प्रेस क्लब यांच्यात रंगतदार झालेल्या अंतिम सामन्यात एका चेंडूत सहा धावांची गरज असताना गोरेगाव संघाच्या खेळाडूने षटकार लगावला आणि या संघाने प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले.

पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे, समीर वारे, पेण पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदीप बागुल, ॲड. मंगेश नेने, वनविभाग अधिकारी कुलदीप पाटकर, राजूशेठ पिचिका, मुदस्सीर अखवारे, दत्ता कांबळे, आरटीओ अधिकारी महेश देवकाते, जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे, प्रवीण पाटील, नंदेश पाटील, महावितरणचे अधिकारी मेश्राम, हरीश बेकावडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पेण अध्यक्ष राजेश कांबळे, उपाध्यक्ष विनायक पाटील, सचिव स्वप्नील पाटील, सहसचिव सुदर्शन शेळके, खजिनदार किरण बांधणकर, सल्लागार दीपक लोके, सहसल्लागार गणेश पाटील, सदस्य रूपेश गोडिवले, मितेश जाधव, प्रशांत पोतदार आदींच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून क्रिकेट सामन्याची सुरुवात करण्यात आली.

पेण पोलीस विरुद्ध महावितरण पेण संघ, तर सामाजिक व राजकीय मंडळी तसेच प्रांत, तहसील, वनविभाग कर्मचारी यांच्यात मैत्रीपूर्ण सामना खेळवण्यात आला.

पनवेल, अलिबाग, नागोठणे, गोरेगाव, खालापूर रोहा, पेण आदी ठिकाणचे पत्रकार तसेच जेएसडब्ल्यूचे अधिकारी आत्माराम बेटकेकर, जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती संजय जांभळे, बाफना ज्वेलर्सचे विशाल बाफना, गॅलेक्सी हॉस्पिटलचे डॉ. रत्नदीप गवळी, डायरेक्टर रोहन पंदारे, ज्येष्ठ पत्रकार विजय मोकल, पेण प्रेस क्लबचे अध्यक्ष देवा पेरवी तसेच राजकीय, सामाजिक क्रिकेटप्रेमींनी सकाळपासून मैदानावर उपस्थित राहून खेळाचा मनमुराद आनंद लुटला.

स्पर्धेत तृतीय क्रमांक अलिबाग आणि चतुर्थ क्रमांक पेण संघाने पटकावला. मालिकावीर आशिष मोरे (रोहा), उत्कृष्ट फलंदाज मंथन पाटील (पेण), उत्कृष्ट गोलंदाज आदिनाथ (गोरेगाव) आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक प्रणित (गोरेगाव) यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर

## नाशिकच्या आकाश शिंदेकडे नेतृत्व

**मुंबई : प्रतिनिधी**

ओडिशामध्ये होणाऱ्या ७१व्या पुरुष राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राने शुक्रवारी (दि. १४) आपला पुरुष संघ जाहीर केला. कटक येथील जे. एन. बंदिस्त क्रीडा संकुलात २० ते २३ फेब्रुवारीदरम्यान, ही स्पर्धा खेळविण्यात येईल. नाशिकच्या आकाश शिंदेकडे पुन्हा एकदा या संघाच्या नेतृत्वाची धुरा देण्यात आली आहे.



गतवर्षी महाराष्ट्रात झालेल्या ७०व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष संघाने उपांत्य फेरीत धडक देत तृतीय क्रमांक मिळविला होता. यंदाच्या स्पर्धेसाठी निवडण्यात आलेला हा संघ १९ फेब्रुवारी रोजी पहाटे स्पर्धेकरिता कटक येथे रवाना होईल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने एका पत्रकाद्वारे प्रसारमाध्यमांना दिली.

संघ : आकाश शिंदे संघनायक, आकाश रूडले, शंकर गदई, तेजस पाटील, संकेत सावंत, अक्षय सूर्यवंशी, मयूर कदम, शिवम पठारे, प्रणय राणे, अजित चौहान, कृषिकेश भोजने, संभाजी वाबळे; प्रशिक्षक प्रताप शेट्टी, व्यवस्थापक सचिन शिंदे.

# कामोठ्यात उद्या सोसायटी प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रदीप भगत युवा मंच प्रभाग ११ यांच्या विद्यमाने १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत कामोठे येथे सोसायटी प्रीमिअर लीग बॉक्स क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

सेक्टर २२मधील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे होणाऱ्या या स्पर्धेतील विजेत्या संघाला १० हजार रुपये व चषक, तर उपविजेत्या संघाला पाच हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. आधिक माहितीसाठी सचिन यमगर (९७६८५८७१३१), सुयोग्य वाफारे (९३७२१७५३३६), शैलेश परबळकर (९९३०३०७८४९) किंवा नयन चौगुले (९०८२०७६४०७) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन माजी नगरसेविका अरुणा भगत, संजसेवक प्रदीप भगत यांनी केले आहे.

# चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी न्यूझीलंडला धक्का!

## गोलंदाज बेन सीयर्स स्पर्धेतून बाहेर

**कराची : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच न्यूझीलंड संघाला वेगवान गोलंदाज बेन सीयर्सच्या रूपाने मोठा धक्का बसला आहे. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे तो संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला आहे. न्यूझीलंड क्रिकेटने बेनच्या जागी बदली खेळाडूचे नाव जाहीर केले आहे.

किवी संघ नुकताच पाकिस्तानमध्ये पोहचला आहे, जिथे तो चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी तिरंगी मालिकेत खेळत आहे. न्यूझीलंड क्रिकेटने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात असे म्हटले आहे की कराचीमध्ये सराव करताना हॅमस्ट्रिंगची दुखापतीनंतर बेन सियर्सचे स्कॅन करण्यात आले होते. त्यानंतर आता त्याला किमान दोन आठवडे मैदानाबाहेर राहावे लागेल. अशा परिस्थितीत, आम्ही सध्या सुरू असलेल्या तिरंगी मालिकेत किवी संघाचा भाग असलेल्या सीयर्सच्या जागी वेगवान गोलंदाज जेकब डफीचा चॅम्पियन्स ट्रॉफी संघात समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.



पनवेल : कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते विक्रांतदादा पाटील प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित आमदार चषक २०२५ दिवस रात्र क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी भाजप अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अकबर सय्यद, विक्रांतदादा पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष राहुल बोर्डे, निशांत गोयल, गोविंद घाडगे, संदीप डोंगरे, विजय पगारे, रूपेश बोर्डे, रवी रत्नपारखी, प्रदीप देशमुख, प्रशांत कदम, तानाजी खंडागळे, देविदास खेडकर, राजेश पाटील, संजय पाटील, निलेश वाडेकर, विवेक सावंत, रोहन वाजेकर, सचिन कुलकर्णी, अभिजित देशमुख, रणजीत देशमुख आदी उपस्थित होते.




# कर्जतच्या पाच तायक्वांदोपटूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्टेट तायक्वांदो चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याकडून कर्जत येथील शारदा विद्यामंदिरच्या पाच विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या खेळाडूंनी केलेल्या खेळाच्या जोरावर रायगड जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला.

मुंबई महानगरातील परळ येथे जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कर्जतच्या शारदा विद्यामंदिरचे खेळाडू प्रेम देशमुख, विहान पेरणेकर, विनंती खडके, माही चौहान, कबीर गायकवाड यांनी सुवर्णपदक आणि रौप्यपदक जिंकले. त्यांना शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक सौरभ गुरव यांचे प्रशिक्षण लाभले.

यशस्वी खेळाडूंचे महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष सुनील सावंत यांनी कौतुक करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




# चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी कोट्यवधींची बक्षिसे

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी ही स्पर्धा तब्बल आठ वर्षांनंतर पुन्हा खेळवली जात आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत, पाकिस्तान, न्यूझीलंड, बांगलादेश हे संघ अ गटात आहेत, तर ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान हे संघ ब गटात आहेत. दरम्यान, आयसीसीने या स्पर्धेसाठी बक्षिसाची रक्कम जाहीर केली आहे.

२०१७नंतर प्रथमच आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १९ फेब्रुवारीपासून स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या स्पर्धेचे यजमानपद पाकिस्तानकडे आहे. यासह १९९६नंतर प्रथमच पाकिस्तानला आयसीसी स्पर्धेचे यजमानपद मिळाले आहे, तर भारताचे सर्व सामने हे दुबईमध्ये होणार आहेत.

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या संपूर्ण बक्षिसाची एकूण रक्कम ही तब्बल ६.९ मिलियन डॉलर्स म्हणजेच भारतीय चलनानुसार ५९ कोटी इतकी आहे. ही रक्कम २०१७च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या एकूण बक्षिसाच्या रकमेपेक्षा ५३ टक्केने वाढवण्यात आली आहे.

विजेत्या संघाला २.२४ मिलियन म्हणजेच १९ कोटी ४५ लाख रक्कम मिळणार आहे. उपविजेत्या संघाला १.१२ मिलियन म्हणजेच ९.७२ कोटी, तर उपांत्य फेरीतील प्रत्येक पराभूत संघाला ५.६० मिलियन म्हणजेच ४.८६ कोटी मिळतील.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com